आनंद सागर
मंगल कार्यालय



शाकाहारी करिता

एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.

* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम

आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

जलसेवा



अंकुश पाटील
श्रीराम कॉम्प्लेक्स, आसना बायपास कॉर्नर, सांगवी (बु.) नांदेड-४३१६०५
9767109771, 7767909771

* वर्ष ६५ वे * अंक ३०० * नांदेड * मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे १६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

गोदातीर समाचार


शुभ दीपावली
आज दीपावली पाडवा!
त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा

–संपादक

सुट्टीची सूचना

दिवाळीनिमित्त दि. १० व ११ नोव्हेंबर २०२६ रोजी दै. गोदातीर समाचार कार्यालयास सुट्टी असल्याने दि. ११ व १२ नोव्हेंबर २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक











जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

ट्रम्प यांचा पराभव : भारतासाठी सुवर्ण संधी

अमेरिकेच्या राजकारणात मध्यावधी निवडणुकांना केवळ सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रियतेची परीक्षा मानता येत नाही, तर त्या राष्ट्राध्यक्षांच्या धोरणांवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतिबिंबही असते. नोव्हेंबर २०२६ मध्ये झालेल्या मध्यावधी निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाने संसदेच्या दोन्ही सभागृहांवर नियंत्रण मिळवून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या रिपब्लिकन पक्षाला दिलेला धक्का हा अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणापुरता मर्यादित नाही. त्याचे पडसाद जागतिक राजकारणात आणि विशेषतः भारत-अमेरिका संबंधांमध्ये उमटण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांच्या एकतर्फी निर्णयांना आता संसदेतील विरोधाचा सामना करावा लागणार असल्याने भारताला आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांसाठी नव्याने राजनैतिक आणि आर्थिक संधी उपलब्ध होऊ शकतात. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील धोरणांचे वैशिष्ट्य म्हणजे आक्रमक राष्ट्रवाद, संरक्षणवादी व्यापारनीती आणि अमेरिकेच्या आर्थिक हितांना सर्वोच्च प्राधान्य. 'अमेरिका फर्स्ट'च्या घोषणेखाली त्यांनी मित्रदेशांनाही व्यापार शुल्काच्या माध्यमातून दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न केला. भारतालाही त्याची मोठी किंमत मोजावी लागली. भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क एकेकाळी ५० टक्क्यांपर्यंत पोहोचले होते. नंतर बहुतांश वस्तूंवरील शुल्क १८ टक्क्यांवर आणण्यात आले असले, तरी हा प्रश्न पूर्णपणे संपलेला नाही. भारतीय निर्यातदारांसाठी अमेरिकेची बाजारपेठ अत्यंत महत्त्वाची असल्याने शुल्कातील अनिश्चितता उद्योग, रोजगार आणि परकीय चलनाच्या उत्पन्नावर परिणाम करणारी आहे. काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांवर डेमोक्रॅट्सचे नियंत्रण आल्यामुळे ट्रम्प यांच्या व्यापारविषयक निर्णयांची अधिक कठोर छाननी होण्याची शक्यता आहे. आयात शुल्कामुळे अमेरिकेतील ग्राहकांवर वाढणारा आर्थिक भार आणि उद्योगांच्या उत्पादन खर्चावर होणारे परिणाम यांची चर्चा होईल. त्यामुळे भारताला व्यापारविषयक वाटाघाटींसाठी अधिक अनुकूल वातावरण मिळू शकते. मात्र, डेमोक्रॅटिक पक्ष सत्ताधारी रिपब्लिकन पक्षापेक्षा व्यापाराच्या बाबतीत अधिक उदार असेल, असे गृहीत धरणे चुकीचे ठरेल. अमेरिकेचे आर्थिक हित आणि देशांतर्गत रोजगाराचे संरक्षण या मुद्द्यांवर दोन्ही पक्षांची भूमिका अनेकदा समान राहिली आहे. कारण शेवटी दोन्हीही एका झाडावरची फळं आहेत. त्यामुळे भारताने केवळ राजकीय बदलावर विसंबून न राहता व्यापारविषयक चर्चेत स्वतःची बाजू ठामपणे मांडली पाहिजे. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात हा भारतासाठी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने आपल्या ऊर्जा गरजा आणि आर्थिक हित लक्षात घेऊन रशियाकडून तुलनेने स्वस्त दरात कच्चे तेल खरेदी करण्याचे धोरण स्वीकारले. भारताच्या तेल आयातीतील रशियन तेलाचा वाटा ऑगस्टमध्ये सुमारे ४४ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. मात्र, रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. हा दबाव भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणासाठी आव्हान ठरला. डेमोक्रॅट्सच्या संसदीय वर्चस्वामुळे अशा आक्रमक निर्णयांच्या आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय परिणामांवर प्रश्न उपस्थित होऊ शकतात. भारताला त्यामुळे ऊर्जा सुरक्षेच्या मुद्द्यावर अधिक प्रभावीपणे आपली भूमिका मांडता येईल. एच-१बी व्हिसाचा प्रश्नही भारतीयांसाठी अत्यंत संवेदनशील आहे. अमेरिकेतील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारतीय व्यावसायिकांचे मोठे योगदान आहे. नव्या एच-१बी अर्जांसाठी एक लाख डॉलर शुल्क लावण्याच्या प्रस्तावामुळे भारतीय कुशल मनुष्यबळ आणि आयटी कंपन्यांसमोर अनिश्चितता निर्माण झाली होती. पण अमेरिकेच्या न्यायालयाने ट्रम्प यांचा हा निर्णय रद्द केला आहे. अमेरिकेतील तंत्रज्ञान उद्योगाला भारतीय अभियंते आणि कुशल व्यावसायिकांची आवश्यकता आहे. त्यामुळे व्हिसा धोरणातील कठोरता अमेरिकेच्याही आर्थिक हिताला बाधक ठरू शकते. डेमोक्रॅट्स या धोरणाच्या परिणामांची तपासणी करण्यासाठी दबाव आणू शकतात. परिणामी भारतीय व्यावसायिकांना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, भारत-अमेरिका संबंधांचे संपूर्ण चित्र केवळ व्यापार, तेल आणि व्हिसा या तीन मुद्द्यांपुरते मर्यादित नाही. चीनचा वाढता विस्तारवादी प्रभाव, हिंद-प्रशांत क्षेत्रातील सामरिक स्थैर्य, संरक्षण तंत्रज्ञान आणि दहशतवादविरोधी सहकार्य या मुद्द्यांवर दोन्ही देशांचे हितसंबंध एकमेकांशी जोडलेले आहेत. अमेरिकेतील दोन्ही प्रमुख पक्षांचा भारतासोबत संरक्षण सहकार्य वाढविण्याला पाठिंबा राहिला आहे. त्यामुळे संसदेतील सत्ताबदलामुळे या क्षेत्रातील सहकार्याला मोठा धक्का बसण्याची शक्यता कमी आहे. या निवडणूक निकालातून भारताने एक महत्त्वाचा धडा घेतला पाहिजे. अमेरिकेतील कोणताही राष्ट्राध्यक्ष भारताचा कायमस्वरूपी मित्र किंवा विरोधक नसतो. तेथील परराष्ट्र आणि व्यापार धोरणे प्रामुख्याने अमेरिकेच्या राष्ट्रीय हितांभोवती फिरतात. त्यामुळे भारताने व्यक्तिकेंद्रित राजकारणाऐवजी संस्थात्मक संबंध अधिक मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे. व्हाइट हाऊसबरोबरच अमेरिकी काँग्रेस, उद्योगजगत, तंत्रज्ञान क्षेत्र आणि प्रभावशाली धोरणकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद ठेवणे आवश्यक आहे. ट्रम्प यांच्या पराभवामुळे भारतासमोरील सर्व आर्थिक आणि राजनैतिक प्रश्न आपोआप सुटणार नाहीत. डेमोक्रॅट्सचे संसदीय वर्चस्व म्हणजे भारताला अनुकूल निर्णयांची हमीही नाही. मात्र, एकतर्फी निर्णयांना संसदीय विरोधाचा सामना करावा लागणार असल्याने भारताला चर्चेच्या टेबलावर अधिक वाव मिळू शकतो, एवढे मात्र खरे आहे. जागतिक राजकारणात बदलत्या परिस्थितीचा फायदा तोच देश घेऊ शकतो, जो आपल्या हितसंबंधांबाबत स्पष्ट आणि मुत्सद्देगिरीत कुशल असतो. अमेरिकेतील सत्तासमीकरणातील हा बदल भारतासाठी संधीची खिडकी उघडणारा ठरू शकतो. मात्र, त्या संधीचे आर्थिक आणि सामरिक लाभात रूपांतर करण्यासाठी भारताला सावध, संतुलित आणि आत्मविश्वासपूर्ण परराष्ट्र धोरणाची गरज आहे. अमेरिकेतील राजकीय बदलांकडे केवळ ट्रम्प यांच्या पराभवाच्या चष्म्यातून न पाहता, भारताच्या राष्ट्रीय हितांची पूर्तता करण्याची संधी म्हणून पाहणे अधिक महत्त्वाचे ठरेल.

दिवाळी : संस्कृतीचा सुगंध, नात्यांचा गंध



काही सण कॅलेंडरवर येतात आणि निघून जातात; पण काही सण मनाच्या कोपऱ्यात कायमचे घर करून राहतात. दिवाळी हा असाच एक सण! तिच्या आगमनाची चाहूल लागली की मनात बालपणीच्या आठवणींची फुले उमलू लागतात.अंगणातील सडा, रांगोळीचे रंग, मातीच्या पणत्यांचा मंद प्रकाश, फराळाचा दरवळ आणि घरातील माणसांची लगबग... या साऱ्या गोष्टींनी दिवाळी केवळ सण न राहता जीवनाचा एक सुंदर अनुभव बनते.

दिवाळीच्या आठवणी म्हणजे संस्कृतीच्या मातीतील सुगंधी ठेवा. बालपणी दिवाळीच्या सुट्टीची ओढ असायची. नवीन कपड्यांचा आनंद, अभ्यंगस्नानाची तयारी, घरातील ज्येष्ठांच्या हातून मिळणारा आशीर्वाद आणि मित्रांसोबत सण साजरा करण्याचा उत्साह यांतून आनंदाचे विश्व निर्माण व्हायचे. त्या काळात साधनांची रेलचेल नव्हती; पण मनांची श्रीमंती होती. घर लहान असले तरी माणसांमधील प्रेम मोठे होते. फराळ थोडा असला तरी त्याची चव आपुलकीने अधिक गोड व्हायची.

आज काळ बदलला आहे. घरांची रचना बदलली, जीवनशैली बदलली, खरेदीची साधने वाढली आणि सण साजरा करण्याची पद्धतही बदलली. पूर्वी घराघरांत बनणारा फराळ आता बाजारपेठेत सहज उपलब्ध होतो. मातीच्या पणत्यांच्या जागी आकर्षक विद्युत रोषणाई आली. प्रत्यक्ष भेटीगाठींच्या जागी मोबाईलवरील शुभेच्छांनी घेतली. बदल हा काळाचा स्वभाव आहे; परंतु बदलाच्या प्रवाहात संस्कृतीचा आत्मा हरवू नये, हीच खरी काळजी.

दिवाळीच्या सणात संस्कृतीचा सुगंध असतो. तो केवळ परंपरांच्या पालनात नसून त्यामागील भावनेत असतो. वसुबारस पशुधनाविषयी कृतज्ञता व्यक्त करते.धनत्रयोदशी आरोग्य आणि समृद्धीची जाणीव करून देते. नरकचतुर्दशी वाईट प्रवृत्तींचा नाश करण्याचा संदेश देते.लक्ष्मीपूजन श्रम, संपत्ती आणि सदाचाराचे महत्त्व अधोरेखित करते. भाऊबीज नात्यांमधील प्रेम आणि विश्वास दृढ करते. या प्रत्येक परंपरेत जीवन जगण्याची एक सुंदर शिकवण दडलेली आहे.

दिवाळीचा खरा गंध मात्र नात्यांतून दरवळतो. वर्षभर कामाच्या व्यापात दूर गेलेली माणसे या सणाच्या निमित्ताने एकत्र येतात. आईच्या हातचा फराळ, वडिलांचे आशीर्वाद, भावंडांमधील हसरे संवाद आणि मुलांच्या निरागस आनंदाने घर भरून जाते. एखाद्या जुन्या आठवणीचा उल्लेख झाला की हशा पिकतो. मनातील गैरसमज दूर होतात. नात्यांमध्ये पुन्हा जिव्हाळा निर्माण होतो. हेच दिवाळीचे खरे वैभव आहे.परंतु, आजच्या समाजात नात्यांचे स्वरूप काहीसे बदलत चालले आहे.धावपळीच्या जीवनात माणसांना एकमेकांसाठी वेळ देणे कठीण झाले आहे. वृद्ध आई-वडील मुलांच्या सहवासासाठी आसुसलेले असतात. काही कुटुंबांत संवादाऐवजी मौन वाढते.नात्यांमधील अंतर घराच्या अंतरापेक्षा मनाच्या अंतराने मोजले जाऊ लागले आहे. अशा परिस्थितीत दिवाळी हा नात्यांना पुन्हा जोडण्याचा सुंदर अवसर ठरू शकतो.

दिवाळीच्या आनंदाला सामाजिक जाणिवेची जोड मिळाली, तर या सणाचे सौंदर्य अधिक खुलते.आपल्या घरात फराळाचे ताट सजवताना शेजारच्या गरजू कुटुंबाची आठवण यावी.नवीन कपडे घेताना एखाद्या गरजू मुलाच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा विचार मनात यावा. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना भेटून त्यांच्यासोबत काही क्षण घालवावेत. कष्टकरी माणसांच्या श्रमांचा सन्मान करावा. आपल्या आनंदात दुसऱ्याचा आनंद सामावून घेणे, हीच संस्कृतीची खरी ओळख आहे.

दिवाळी आणि निसर्ग यांचेही एक सुंदर नाते आहे.मातीच्या पणत्यांमधून मिळणारा मंद प्रकाश, फुलांची सजावट आणि निसर्गाशी सुसंगत असलेली परंपरा आपल्या जीवनाला साधेपणाची शिकवण देते.आज प्रदूषण आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांची चिंता वाढत असताना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करणे ही काळाची गरज आहे. सणाचा आनंद दुसऱ्याच्या आरोग्याला किंवा निसर्गाला त्रास देणारा नसावा.खरे तर दिवाळी ही घराच्या उंबरठ्यावर लावलेल्या पणतीपुरती मर्यादित नाही. ती आपल्या वर्तनात, विचारांत आणि नात्यांमध्ये उजळली पाहिजे. मनातील कटुता दूर झाली, संवाद वाढला, गरजूंच्या जीवनात आनंद निर्माण झाला आणि समाजात सद्भावना वाढली, तर दिवाळीचा संस्कृतीचा सुगंध सर्वत्र दरवळेल.

दिवाळीचे दिवे काही तास उजळतात; पण नात्यांतील प्रेमाचा दिवा आयुष्यभर प्रकाश देतो. चला, यंदा संस्कृतीचा सुगंध जपूया, नात्यांचा गंध दरवळू देऊया आणि आपल्या आनंदात संपूर्ण समाजाला सहभागी करून घेऊया. हीच दिवाळीची खरी श्रीमंती, हीच संस्कृतीची खरी ओळख!

-पंडित पवळे
नांदेड

महाराष्ट्राची लोककला वाचवा; कलावंतांना राजाश्रय द्या!

महाराष्ट्राची लोकसंस्कृती ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ती राज्याच्या समृद्ध परंपरेची, सामाजिक जाणीवेची आणि ऐतिहासिक वारशाची ओळख आहे. तमाशा, लावणी, भारूड, गोंधळ, पोवाडा, कीर्तन, वासुदेव, दशावतार अशा विविध लोककलांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला समृद्ध केले आहे. मात्र, आधुनिक मनोरंजनाच्या वाढत्या प्रभावामुळे आणि आर्थिक संकटामुळे याच लोककला आज अस्तित्वाची लढाई लढत आहेत. राज्यातील सुमारे ४५० तमाशा फड आणि त्यांच्याशी संबंधित १५ हजारांहून अधिक कलावंतांवर उपासमारीची वेळ आल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. ही केवळ एका कलाप्रकाराची व्यथा नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणापुढील गंभीर आव्हान आहे.

लोककलेचे अस्तित्व धोक्यात

तमाशा क्षेत्राचे वास्तव चिंताजनक आहे. दुष्काळ, पाणीटंचाई, गावोगावच्या यात्रा आणि उरूस रद्द होणे, प्रेक्षकांच्या आवडीनिवडींमध्ये होणारे बदल आणि वाढता खर्च यामुळे तमाशा फडांचे आर्थिक गणित कोलम डले आहे. तमाशाचा हंगाम साधारण आठ महिने चालतो. कलावंत, वादक, नर्तिका, तंत्रज्ञ आणि अन्य कामगारांना रोजगार देण्यासाठी फडमालकांना मोठा खर्च करावा लागतो. मात्र, उत्पन्न घटल्यामुळे हा खर्च भागविणे कठीण झाले आहे.


तमाशा म्हणजे केवळ नृत्य आणि गाणे नव्हे. गण, गवळण, बतावणी, वगनाट्य आणि शाहिरीच्या माध्यमातून लोकजीवनाचे प्रतिबिंब दाखविणारी ती एक समृद्ध कलापरंपरा आहे. समाजातील विसंगतींवर भाष्य करणे,



ऐतिहासिक घटनांचे स्मरण करून देणे आणि मनोरंजनातून प्रबोधन करणे, ही तमाशाची वैशिष्ट्ये आहेत. या कलेच्या मागे अनेक पिढ्यांची साधना, अनुभव आणि सांस्कृतिक परंपरा उभी आहे. त्यामुळे तमाशा फड बंद पडणे म्हणजे केवळ एका व्यवसायाचे नुकसान नव्हे, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशातील एक महत्त्वाचा दुवा नष्ट होण्याचा धोका आहे.

कलावंतांच्या पाठीशी राजाश्रय हवा

इतिहासात कला आणि संस्कृतीच्या विकासासाठी राजाश्रयाला महत्त्वाचे स्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून महाराष्ट्रात शाहिरी आणि लोकपरंपरांना प्रेरणा मिळाली. पुढील काळातही विविध राजे, संस्थानिक आणि समाजधुरीणांनी कलाकारांना प्रोत्साहन दिले. कला टिकविण्यासाठी केवळ प्रेक्षकांची दाद पुरेशी नसते; कलाकारांना सन्मानाने जगता येईल, अशी आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था आवश्यक असते.



आज लोकशाही व्यवस्थेत सरकारने हाच राजाश्रय आधुनिक स्वरूपात उपलब्ध करून देण्याची गरज आहे. लोककलावंतांना आर्थिक मदत, नियमित मानधन, आरोग्य विमा, वृद्धापकाळ निवृत्तिवेतन आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विशेष योजना उपलब्ध झाल्या पाहिजेत. केवळ पुरस्कार देऊन किंवा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून सरकारची जबाबदारी संपत नाही. लोककलेचे जतन करणाऱ्या कलाकारांना वर्षभर आर्थिक आधार मिळेल, याची खात्री करणे आवश्यक आहे.

तमाशा फडांना टोलमाफी, डिझेल खर्चात सवलत, वाहतूक करातून दिलासा आणि ज्येष्ठ कलावंतांच्या मानधनात वाढ यांसारख्या उपाययोजना तातडीने राबविणे गरजेचे आहे. दुष्काळामुळे यात्रा आणि उरूस रद्द झालेल्या भागांतील कलावंतांसाठी विशेष आर्थिक मदत जाहीर केली पाहिजे.

नव्या पिढीला लोककलेशी जोडावे

पारंपरिक तमाशातील गण, गवळण आणि वगनाट्यापेक्षा हिंदी-मराठी गाण्यांच्या कार्यक्रमांना वाढती पसंती मिळत असल्याने लोककलेचे मूळ स्वरूप टिकविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. काळानुसार बदल स्वीकारणे आवश्यक असले, तरी त्या प्रक्रियेत कलेचा आत्मा हरवता कामा नये. लोककलेची लोकप्रियता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करता येईल. दर्जेदार ध्वनिचित्रफिती तयार करून त्यांचे प्रसारण करणे, लोककलांचे दस्तऐवजीकरण करणे आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचा इतिहास पोहोचविणे आवश्यक आहे.

शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लोककला महोत्सव आयोजित करावेत. विद्यार्थ्यांना पारंपरिक कलाप्रकार प्रत्यक्ष अनुभवता यावेत, यासाठी कलावंतांची प्रात्यक्षिके आयोजित केली पाहिजेत. राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रम, पर्यटन महोत्सव आणि शासकीय सोहळ्यांमध्ये स्थानिक लोककलावंतांना नियमित संधी दिली पाहिजे. सरकारी कार्यक्रमांसाठी कलाकारांची निवड करताना स्थानिक लोककला पथकांना प्राधान्य दिल्यास त्यांना रोजगारही मिळेल आणि कलेला नवे व्यासपीठही उपलब्ध होईल.

लोककला संवर्धनासाठी स्वतंत्र धोरण हवे

महाराष्ट्र सरकारने लोककलांच्या संवर्धनासाठी सर्वंकष धोरण आखण्याची वेळ आली आहे. राज्यातील लोककलावंतांची अधिकृत नोंदणी करून त्यांच्या आर्थिक स्थितीचे सर्वेक्षण करावे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांसाठी विशेष निधी निर्माण करावा. लोककलांच्या प्रशिक्षणासाठी केंद्रे सुरू करावीत आणि पारंपरिक कलाप्रकार शिकविणाऱ्या ज्येष्ठ कलाकारांना प्रशिक्षक म्हणून मानधन द्यावे. तमाशा फडांना आर्थिक मदत देताना त्यांच्या कलात्मक योगदानाचा आणि रोजगारनिर्मितीचा विचार केला पाहिजे.

यात्रा आणि उरूस हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे तसेच लोककलांच्या सादरीकरणाचे महत्त्वाचे केंद्र आहेत. दुष्काळी परिस्थितीत या परंपरांचे सातत्य राखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि सांस्कृतिक विभागाने समन्वय साधावा. शक्य तेथे पर्यायी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून कलाकारांना काम उपलब्ध करून द्यावे.

महाराष्ट्राची संस्कृती ही केवळ ऐतिहासिक स्मारकांत किंवा पुस्तकांत जिवंत राहत नाही; ती लोकांच्या जगण्यात, त्यांच्या बोलीभाषेत, गाण्यांत, नृत्यात आणि परंपरांतून प्रवाहित होत असते. या प्रवाहाला जिवंत ठेवणारे कलावंत उपासमारीने त्रस्त असतील, तर सांस्कृतिक समृद्धीच्या दाव्यांना अर्थ उरत नाही.

कलावंत वाचले तरच कला टिकेल! महाराष्ट्राच्या लोककलेचे संवर्धन ही सरकारची केवळ औपचारिक जबाबदारी नसून, ती राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेच्या रक्षणाची बांधिलकी आहे. तमाशासह सर्व लोककलांना योग्य राजाश्रय, आर्थिक सुरक्षा आणि समाजाचा सन्मान मिळाला पाहिजे. अन्यथा, पुढील पिढ्यांना महाराष्ट्राच्या या समृद्ध परंपरा प्रत्यक्ष अनुभवण्याऐवजी केवळ इतिहासाच्या पानांतूनच जाणून घ्याव्या लागतील. ही वेळ येऊ नये, यासाठी सरकार, समाज आणि सांस्कृतिक संस्थांनी आताच ठोस पावले उचलली पाहिजेत.

-प्रा. सु. ग. जाधव
नांदेड
मो.९४२३१४०७४१

'दिवाळी एक प्रकाशोत्सव'

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा.' हिंदू धर्मात दिवाळी सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

दिवाळी आहे आपला
सर्वात मोठा सण
म्हणून धूमधडाक्यात
करतो साजरा प्रत्येकजण

हा सण संपूर्ण भारतामध्ये सर्वत्र साजरा केला जातो. हजारो वर्षांपासून हा सण साजरा करण्याची पद्धत रूढ आहे. या सणानिमित्त संपूर्ण देशभर सार्वजनिक सुट्टी असते. पावसाळा नुकताच संपलेला असतो. खरीप हंगाम संपलेला असतो. नुकतेच पीक आलेले असते. शेतकऱ्याचे घर याच काळात धनधान्याने समृद्ध झालेले असते. तरीही अनेक नैसर्गिक व इतरही अनेक समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागतेच. ही गोष्ट निराळी परंतु त्यातल्या त्यात हा काळ शेतकऱ्याच्या भरभराटीचा काळ असतो. म्हणून 'कृषीउत्सव' स्वरूपात हा सण साजरा करण्याची पद्धत आहे. श्रावण महिन्यापासून सुरु झालेली सणांची मालिका दिवाळीला फार मोठ्या प्रमाणात बहरते. अश्विन वद्य द्वादशी पासून ते कार्तिक शुद्ध द्वितीया पर्यंत हा 'दीपोत्सव' सुरू राहतो. अशाप्रकारे साधारणत: सहा-सात दिवस हा सण अत्यंत आनंदात, उत्साहात व जल्लोषात प्रत्येक घराघरांत, गावागावांत, शहराशहरांत, राज्या-राज्यात, संपूर्ण देशात याच्याही पुढे जाऊन आज संपूर्ण जगात साजरा होत आहे. या दीपावली सणाची व्याप्ती बघून हा सण जागतिक सण झालेला आहे. या सणाच्या संदर्भात अनेक अध्यात्मिक, पौराणिक कथा सांगितल्या जातात. फार मोठे महत्त्व या सणाचे आहे. दिवाळी हा खऱ्या अर्थाने 'कृषीउत्सव' आहे.

दिवाळी या सणाची सुरुवात शेतकऱ्याला शेत पिकवण्यासाठी मोलाची मदत करणाऱ्या बैलाचे व त्याला जन्म देणाऱ्या गाईचे ऋण व्यक्त करण्याच्या दिवसापासून म्हणजे गोवत्स द्वादशी या दिवसापासून होते. रमा एकादशी नंतर येणाऱ्या अश्विन वद्य द्वादशीला गोवत्स द्वादशी, वसुबारस आणि गुरुद्वादशी असे म्हणतात. या दिवशी सवत्स धेनूची विधिवत पूजा करण्याची प्रथा आहे. हिंदू धर्मात गाईला अत्यंत पवित्र मानले आहे. गायीमध्ये ३३ कोटी देवांचा वास आहे असे समजल्या जाते. अशा पवित्र गोमातेची कृतज्ञ अंत:करणाने तिच्या वासरासह, पाडसासह विधीवत पूजा करून तिला नैवेद्य दिला जातो. श्रद्धेने तिचे दर्शन घेतले जाते.

यानंतर आश्विन वद्य त्रयोदशीला 'धनत्रयोदशी' साजरी केली जाते. यालाच 'धनतेरस' असेही म्हणतात. धनत्रयोदशीच्या दिवशी धनधान्याची, धनसंपत्तीची पूजा केली जाते. सर्वत्र दिव्यांचा झगमगाट केला जातो. धनत्रयोदशी ची एक अध्यात्मिक कथा आहे या कथेनुसार या दिवशी अपमृत्यु, अकाली मृत्यू टाळण्यासाठी मृत्यू देवता यमाला दीपदान केले जाते. यमदीपदान करून प्रत्येकजण उदंड आयुष्याची प्रार्थना मृत्यू देवता यमाकडे करतात. याच दिवशी समुद्रमंथनातून आरोग्य देवता श्री धन्वंतरी अमृतकुंभ घेऊन प्रगटले होते. त्यामुळे धनत्रयोदशीच्या दिवशी 'धन्वंतरी जयंती' सुद्धा साजरी केली जाते. यानिमित्ताने सर्व डॉक्टर, वैद्य, आरोग्य क्षेत्रात काम करणारे सर्व कर्मचारी 'धन्वंतरी जयंती' साजरी करतात. श्री धन्वंतरी देवतेची पूजा आराधना करतात. श्री 'धन्वंतरी जयंती' औचित्य साधून संपूर्ण देशभरात डॉक्टर, नर्स, आरोग्य कर्मचारी, सर्व प्रकारची औषधे यांचा आदर-सन्मान केला जातो. आयुर्वेदिक शास्त्रांमध्ये श्री धन्वंतरी देवतेला प्रचंड महत्त्व आहे. दिवसेंदिवस आयुर्वेदाचे महत्त्व संपूर्ण जगाला ज्ञात होत आहे. म्हणूनच संपूर्ण जगात श्री 'धन्वंतरी जयंती' व 'आयुर्वेद दिन' धनत्रयोदशीच्या दिवशी साजरा करण्यात येत आहे. अशाप्रकारे धनत्रयोदशी चे महत्व अनन्यसाधारण आहे.

यानंतर आश्विन वद्य चतुर्दशीला 'नरकचतुर्दशी' म्हणजे दिवाळीचे पहिले पाणी साजरे केले जाते. या मुहूर्तावर अत्यंत अन्यायी असणाऱ्या नरकासुराचा वध भागवान श्रीकृष्णाने केला. व त्याच्या बंदिवासात असणाऱ्या सोळा सहस्र महिलांना मुक्त केले. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्रभू श्रीकृष्णाने या सोळा सहस्र महिलांशी विवाह केला. अशी आख्यायिका सांगितल्या जाते. नरक चतुर्दशीला अभ्यंगस्नानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून सुगंधी उटणे व तेल लावून अभ्यंगस्नान केले जाते. दिवाळी सणात प्रभू श्रीकृष्णाच्या शौर्याचे प्रतिक म्हणून नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो.

अश्विन अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजन. या दिवशी स्थिर मुहूर्तावर श्री लक्ष्मी देवतेची पूजा आराधना केली जाते. घरामध्ये सुख, शांती, समृद्धी व आर्थिक भरभराट राहावी यासाठी श्री लक्ष्मी देवतेची उपासना केली जाते. श्रीसुक्ता चे पठण करण्यात येते. यथोचित व षोडशोपचार श्री लक्ष्मीदेवीची पूजाविधी घराघरात होतो. व्यापारी मंडळी यादिवशी आपल्या दुकानात विधिवत श्री लक्ष्मी देवीची पूजा उपासना करतात. वही पूजन केले जाते. याच लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर घराघरात लक्ष्मी रूपात वावरणाऱ्या लेकी-सुना, माता-भगिनी, यांचा सुद्धा यथोचित सन्मान केला जातो. त्यांचा आदर सत्कार करण्यात येतो.

कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजेच 'बलिप्रतिपदा' यालाच 'दिवाळी पाडवा' असेही म्हणतात. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणारा हा मुहूर्त आहे. या दिवशी बळीराजाची पूजा केली जाते. बळी हा शेतकऱ्यांचा राजा आहे. म्हणून आजचा शेतकरी हाच खऱ्या अर्थाने बळीराजाचे प्रतिनिधित्व करतो. बळीराजा खूप दानशूर असतो. त्याच्याकडे आलेल्या कुणालाही दान देऊन तृप्त केल्याशिवाय तो परत पाठवत नाही. त्याचप्रमाणे आजचा शेतकरी सुद्धा संपूर्ण जगाला, विश्वाला भरभरून देत आहे. शेतकरी हा संपूर्ण जगाचा, विश्वाचा पोशिंदा आहे. तरीसुद्धा अनेक अस्मानी-सुलतानी संकटाला आजही शेतकऱ्याला सामना करावा लागत आहे. आजही शेतकऱ्यावर एकामागून एक अशी अनेक संकटे येत आहेत. हा आजचा बळीराजा संकटाशी सामना करता करता हतबल होत आहे. या शेतकऱ्यांच्या जीवनातील दु:ख नाहीसे व्हावे व त्याच्या जीवनातही सुखाचे दिवस यावेत यासाठीच 'बलिप्रतिपदा' म्हणजे 'दिवाळी पाडवा' साजरा केला जातो. म्हणून या दिवशी म्हणतात..

इडा पिडा टळू दे
बळी राज्य येऊ दे...
माझ्या शेतकऱ्यावरची संकटे
देवा आता तरी संपू दे....
त्याच्याही जीवनात सुखाचे
चार दिवस येऊ दे....

याच दिवशी संपूर्ण गोकुळ वासियांचे इंद्र प्रकोपाने होणाऱ्या अतिवृष्टी पासून संरक्षण करण्यासाठी भगवान जगद्गुरु श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलण्याची अख्यायिका सांगितली जाते. त्यामुळे बलिप्रतिपदेच्या दिवशी भक्तीभावाने गोवर्धन पर्वत उचलून सर्वसामान्याचे रक्षण करणाऱ्या प्रभू श्रीकृष्णांची पूजा केली जाते. व्यापारी मंडळी या दिवसापासून नवीन वर्षाला सुरुवात झाली असे म्हणतात. पाडव्याच्या मुहूर्तावर सोने-चांदी, दाग-दागिने, वाहने, व नवनवीन मौल्यवान वस्तूंची खरेदी केली जाते. कोणत्याही कामाची सुरुवात करण्यासाठी सुद्धा हा मुहूर्त अत्यंत शुभ मानला जातो. म्हणून पाडव्याच्या मुहूर्तावर अनेक दुकाने, अनेक कारखाने, अनेक नवीन प्रकल्प सुरु होतात.अशाप्रकारे बलिप्रतिपदेला अत्यंत महत्त्व आहे.

दिवाळी हा सण आता फक्त भारतापुरता मर्यादित राहिलेला नाही. तर दीपावली हा सण आज संपूर्ण जगाम ध्ये उत्साहात, आनंदात आणि जल्लोषात साजरा होत आहे. दिवाळी या सणाला जागतिक स्वरूप येत आहे. जगभरातील भारतीय आपापल्या शहरात दिवाळी साजरी करतात. अमेरिका येथील न्यू जर्सी या भागात भारतासारखी दुकाने सजवलेली आढळतात. लंडन शहरात ही दिवाळी साजरी केली जाते. दिवाळी हा प्रामुख्याने हिंदू तसेच दक्षिण आशिया व आग्नेय आशियातील अन्य धर्मीय समाजांत काही प्रमाणात साजरा केला जातो. भारत, गयाना, त्रिनदा, टोबॅगो, बीजिंग, मलेशिया, म्यानमार, न्यूयार्क, मॉरिशियस, सिंगापूर, श्रीलंका या देशांमध्ये दिवाळीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असते. या सर्व देशात अत्यंत आनंदात, उत्साहात आणि जल्लोषात दिवाळी सण साजरा केला जातो. अशा या जागतिक 'दीपोत्सवाच्या' 'प्रकाशोत्सावाच्या' आपणा सर्वांना खूप खूप तेजोमय शुभेच्छा.

-मयूर मधुकरराव जोशी
जिंतूर
मो. ९७६७७३३५६०

श्री सुभाष क्रेडीट

श्री सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि.,नांदेड

!! श्री दत्त प्रसन्न !!

शुभ दिपावली

सर्व ऊस उत्पादक शेतकरी,ऊस वाहतुक ठेकेदार,कर्मचारी वर्ग व कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा...!



बचत आजची...
समृध्दी उद्याची...

- मुदत ठेवीवर भरघोस मोबदला
- कृषी कर्ज सुविधा
- वैयक्तिक कर्ज सुविधा
- RTGS व NEFT सुविधा
- मोबाईल बँकिंग सुविधा
- SMS सुविधा



मुदत ठेव (F.D) योजना

गुंतवणूक कालावधी		व्याजदर
३० ते ४५ दिवस	–	६.५०%
४६ ते १८० दिवस	–	८.००%
१८१ ते ३६५ दिवस	–	९.००%
३६६ ते ७३० दिवस	–	९.५०%
७३१ दिवसांहुन अधिक	–	१०.००%

★ आवर्त ठेव (R.D.) योजना ★

अ.क्रं.	मासिक रु.	१२ महिने	२४ महिने	३६ महिने	६० महिने
१.	५००	६२९९	१३१९९	२०७४९	३८०६०
२.	१०००	१२५९९	२६३९८	४१४९७	७६११९
३.	२०००	२५१९८	५२७९३	८२९९४	१५२२३८
४.	३०००	३.७७९६	७९१९३	१२४४९१	२२८३५७
५.	५०००	६२९९४	१३१९८८	२०७४८५	३८०५९६

१२,००० हून अधिक
बचत खातेदार - विश्वासाची विक्रमी भरारी...!

शेतकऱ्यांच्या हक्काची संस्था...

श्री सुभाष शुगर प्रा.लि.हडसणी
ता.हदगांव जि.नांदेड
* साखर उत्पादन
* विज निर्मीती

शिऊर साखर कारखाना प्रा.लि,
वाकोडी ता कळमनुरी जि.हिंगोली
* साखर उत्पादन
* आसवनी प्रकल्प

शिऊर ईको प्रा.लि,
वाकोडी ता.कळमनुरी जि.हिंगोली
* कॉम्प्रेस बायोगॅस निर्मीती

शेतकरी हितासाठी व समृध्दीसाठी सदैव प्रयत्नशील...!



शुभेच्छुकः- कर्मचारी वृंद,महसूल संघटना तालुका हदगाव जिल्हा नांदेड.

लक्ष लक्ष दिव्यांनी
उजळून निघो दाही दिशा घेऊ नि
येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा..!!

शुभ दिपावली

निमित्त सर्वांना
मंगलमय
शुभेच्छा..!!



शुभेच्छुक :-
राजेश्वररावजी देशमुख व विनायकराव देशमुख
प्रकाशकः- गजानन कन्स्ट्रक्शन,हदगाव

आपणांस व आपल्या परिवारास

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!



शुभेच्छुक : होनलवाड एम.वाय. (मुख्याध्यापक, यशवंत विद्यालय, धर्माबाद)

आमच्या सर्व ग्राहकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्या



शुभेच्छुक



एम. शंकरगौड नरसागौड



एम.दत्तागौड नरसागौड

MAHALAXMI CONVENTION AND LAWNS
महालक्ष्मी मंगल कार्यालय व लॉन्स

उपलब्ध सुविधा
- सुसज्ज एअरकुल्ड मॅरेज हॉल व डायनींग हॉल.
- निसर्गरम्य वातावरणात लॉन्स समोर ओपन स्टेज.
- 10,000 स्क्वेयर फुट चे नैसर्गीक लॉन्स व गार्डन.
- वधु-वर व नातेवाईकांना थांबण्यासाठी A/C रुम्स ची व्यवस्था.
- हल्दी व संगीत कार्यक्रमासाठी वाहेरील स्टेज व लॉन्स.
- पार्कींग साठी प्रशस्त जागा.
- स्टेज व इतर डेकोरेशनची सुवीधा उपलब्ध.

- लग्न समारंभ
- रिसेप्शन
- ऐंगेजमेंट
- बर्थडे
- मॅरेजडे
- कॉन्फरन्स

व इतर सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी बुकींग सुरु आहे

बुकींगसाठी संपर्क
एम.दत्तागौड नरसागौड
9423136314
9665466314
एम.राजागौड शंकरगौड
9765698111
9422413932



बिद्राळी रोड, धर्माबाद जि. नांदेड.

कृषि उत्पन्न बाजार समिती धर्माबाद तर्फे
सर्व शेलकरी, शेतमजूर, व्यापारी, गुमास्ता व हमाल बांधवांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा




शुभ दीपावली




शेतकरी बांधवांना आवाहन

याद्वारे शेतकरी बांधवांना विनंती पुर्वक कळविण्यात येते की,

१) जर कोणलाही आडत्या किंवा व्यापारी बटाव, कट्टी आहत किंवा इतर कोणताही छुपा खर्च आकारुन शेतकऱ्यांची आथिक लूट करीत असल्यास तसेच पिवळी पट्टी देण्यास नाकारत असल्यास बाजार समितीला कळवावे अशी माहिती देणाऱ्या शेतकऱ्याचे नाव उघड करण्यात येणार नाही गुप्त ठेवण्यात येईल याची नोंद घ्यावी व संबंधित आडत्या, व्यापावाविरुध्व कडक कारवाई करण्यात येईल.

२) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल विक्री करण्यापूर्वी शेतमाल वाळवून, सुकवून, स्वच्छ करून आणावा. तसेच खरेदीदार हा धर्माबाद बाजार समितीचा लायसन्सधारक व्यापारी आहे काय याची खात्री करून घ्यावी.

३) शक्यतोवर आपला शेतमाल धर्माबाद मार्केट यार्डातच विक्रीस आणावा. आपला माल विकल्यावर आडल्या किंवा खरेदीदाराकडून न चुकता बाजार समितीची हिशेब पट्टी (पिवळी पावती) घ्यावी.

४) कोण्या कागदावर चिडी वर अजिबात व्यवहार करु नका, अश्या व्यवहारास बाजार समिती जबाबदार राहणार नाही याची शेतकरी बांधवांनी नांद घ्यावी.

५) कृपया अनामत व्यवहार, कंडिशनल व्यवहार करु नका. थोडक्या पैश्याच्या अमिषाला बळी पडून स्वतःची फसवणूक करून घेऊ नका.

६) कृपया बाजार भावाकडे लक्ष ठेवत जा. शेतीमालामध्ये मोठ्या प्रमाणात तेजी मंदी होत असल्यामुळे अनामत व्यवहारातून आर्थिक धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

७) गेल्यावर्षी अनामत व्यवहार कंडिशनल व्यवहार तसेच कोऱ्या कागदावरील व्यवहार केलेल्या बऱ्याच शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसलेला आहे.

करीता आपण रात्रंदिवस काबाडकष्ट करून पिकविलेल्या मालाला योग्य दाम मिळण्यासाठी आणि अचुक व्यवहार होण्यासाठी कृपया आपण आपला शेतमाल धर्माबादच्या मार्केट यार्डातच विक्रीस आणावा असे आवाहन करण्यात येते.

सि.डी.पाटील
सचिव

अनिल चव्हाण
प्रशासक

कृषि उत्पन्न बाजार समिती धर्माबाद

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



कृषि उत्पन्न बाजार समिती, नांदेड

तर्फे सर्व शेतकरी बांधव, आडते, व्यापारी, हमाल, मापाडी व सर्व बाजार घटकांना

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

शेतकऱ्यांकरिता उपलब्ध सुविधा व योजना

- शेतकऱ्यांचा शेतमाल हळद व इतर नुसार शेतमाल लिलावासाठी वेगवेगळे भव्य दोल ऑक्शन हॉल
- शेतकऱ्यांचा शेतमाल साठवणुकीसाठी भव्य सात टिनशेड
- बाजार आवारात सर्वत्र सिमेंट रोड व्यवस्था
- बाजार आवारात बैंक इमारत, पोस्ट ऑफिस व्यवस्था उपलब्ध
- बाजार आवारात हायमास विद्युत लाईट व्यवस्था शुध्द पाणी पुरवठा, शौचालय व साफसफाई व्यवस्था
- शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था
- शेतकरी व्यापाऱ्याचे शेतीमालावे वजनमापासाठी 30 मे. टन क्षमतेचा इलेक्ट्रॉनिक वजनकाटा
- बाजारभाव प्रक्षेपण संगणक व्यवस्था, सिसिटीव्ही व्यवस्था
- परवानाधारक तोलाराकडुन अचुक वजनमापाची व्यवस्था
- कार्यक्षेत्रांतर्गत कापुस उत्पादक शेतक-यांसाठी भारतीय कपास निगम लि. यांचेव्दारे हमीभावाने कापुस खरेदी करण्यात येतो.
- भविष्यकालीन योजना शेतकऱ्यांकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत शेतकरी भवन बांधकाम प्रगती पथावर आहे.



- शुभेच्छुक -
संजय अण्णासाहेब लहानकर सभापती
भुजंगराव विठ्ठलराव पाटील उपसभापती
गणेश संभाजीराव भारसावडे प्र. सचिव



संचालक मंडळ ▸ भगवानरावजी आलेगावकर ▸ शामराव पा. टेकाळे ▸ नागोराव आढाव ▸ सत्यजित (सुमित) भोसले ▸ गांधीजी पवार ▸ निलेश देशमुख ▸ सौ. गायत्री कदम ▸ सौ. कमलबाई वाघ ▸ खोबाजी (बबनराव) बारसे ▸ निळकंठ मदने ▸ गंगाधर (पिंटु) शिंदे ▸ ज्ञानेश्वर राजेगोरे ▸ नाना पोहरे ▸ ओमप्रकाशजी पोकर्णा ▸ सदाशिवराव देशमुख ▸ शिवाजी दराडे

धर्माबाद नगर परिषद धर्माबाद जि. नांदेड

दुरध्वनी व फॅक्स क्रं.०२४६५-२४४१२९ E-Mail: codharamabadgmail.com
जा.क्र.धनप/पाणी पुरवठा विभाग / २०२६/ ५१९१ दि. ०६/११/२०२६

जाहीर सूचना

धर्माबाद शहरातील सर्व नागरिकांना या जहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, अल-निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे दिनांक ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत अत्यंत काटकसरीने, पाधान्यक्रमाने व नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करून पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शक निर्देश प्राप्त झाले आहेत. संभाव्य पाणी टंचाई व पाणी बचतीच्या दृष्टीने नगर परिषदे मार्फत नागरिकांना पुढील प्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

१. नागरिकांनी उपलब्ध पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा, नळांना तोट्या (Taps) बसवाव्यात आणि पाण्याव्चा वापर अंत्यत काटकसरीने करावा.

२. घरातील नळ, वाश बेसिन किंवा टाक्यामधून होणारी गळती दुरुस्ती करून घ्यावी.

३. वापर योग्य सांडपाण्याचे पुनः वापर करण्यात यावे

४. बोअरवेलचे 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' (Rainwater Harvesting) किंवा सोक पीट (emofJS²>S>m) पद्धतीद्वारे पुनर्भरण करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा.

शहरात कुठेही मुख्य जलवाहिनीची गळारी आढळल्यास किता पाण्याचा अपव्यय होताना दिसल्यास तात्काळ नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधावा, मो.न. ९५९५५६१७२०, ९६३७००३३५१, ९७६७७२२९५७

तरी नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करून नगर परिषदेस सहकार्य करावे.

(श्री कौस्तुभ गव्हाणे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद धर्माबाद

(श्री महेश बोलमवार)
उपाध्यक्ष तथा पाणी पुरवठा सभापती
नगरपरिषद धर्माबाद

(सौ. संगीता महेश बोलमवार)
नगराध्यक्षा
नगरपरिषद धर्माबाद

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com



महागाईचा चटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसू लागला आहे. अन्नधान्याच्या वाढत्या किमती, कच्च्या तेलाचे चढते दर आणि अपुऱ्या मान्सूनमुळे अर्थव्यवस्थेसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. त्यातच सणासुदीचा हंगाम सुरू झाल्याने बाजारातील मागणी वाढण्याची शक्यता आहे. कंपन्यांचा उत्पादन खर्चही वाढत असल्याने आगामी काळात वस्तू आणि सेवांच्या किमती आणखी वाढू शकतात. अशा परिस्थितीत रिझर्व्ह बँकेसमोर महागाईला लगाम घालण्याचे आणि आर्थिक विकासाचा वेग कायम ठेवण्याचे दुहेरी आव्हान असेल. ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमधील महागाईचे आकडे पुढील पतधोरणाची दिशा ठरविण्यात निर्णायक ठरू शकतात.

महागाईचा भडका की व्याजदरांचा दणका?



महागाईच्या मुळाशी तेल आणि मान्सून

सध्याच्या महागाईमागे दोन प्रमुख घटक आहेत. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ आणि दुसरा म्हणजे अपुरा मान्सून. आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार कच्च्या तेलाच्या तुलनेत मान्सूनचा परिणाम अन्नधान्याच्या किमतींवर अधिक जाणवला आहे. अन्नधान्य महागाई जवळपास सहा टक्क्यांवर पोहोचली आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास भाजीपाला, धान्य आणि अन्य कृषी उत्पादनांच्या पुरवठ्यावर परिणाम होतो. परिणामी बाजारातील आवक घटते आणि त्याचा थेट फटका ग्राहकांच्या मासिक खर्चाला बसतो. इंधनाच्या बाबतीत मात्र परिस्थिती काहीशी वेगळी आहे. मे महिन्यात झालेल्या काही दरवाढींनंतर किरकोळ इंधनदर तुलनेने स्थिर राहिले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा संपूर्ण भार अद्याप ग्राहकांवर पडलेला नाही. मात्र ही स्थिती किती काळ कायम राहणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एसबीआय रिसर्चच्या विश्लेषकांनी कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल १२३ डॉलरपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हा अंदाज प्रत्यक्षात उतरल्यास पेट्रोल आणि डिझेलच्या दरांवर पुन्हा वाढीचा दबाव निर्माण होऊ शकतो. इंधन महागाईचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही. पेट्रोल-डिझेलचे दर वाढले की मालवाहतुकीचा खर्च वाढतो. उत्पादन आणि वितरण महागते. त्याचा परिणाम अन्नधान्यापासून ग्राहकोपयोगी वस्तूंपर्यंत अनेक क्षेत्रांवर होतो. त्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ भारतासाठी व्यापक महागाईची मोठी जोखीम ठरते.

कंपन्यांचा वाढता खर्च ग्राहकांच्या माथी?

महागाईचा आणखी एक टप्पा अद्याप ग्राहकांपर्यंत पूर्णपणे पोहोचलेला नसण्याची शक्यता आहे. ग्राहकोपयोगी टिकाऊ वस्तू, कपडे आणि अन्य उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचा कच्चा माल, ऊर्जा आणि वाहतूक खर्च वाढला आहे. या वाढीचा संपूर्ण भार कंपन्यांनी अद्याप ग्राहकांकडे वळवलेला नसेल, तर आगामी काही महिन्यांत उत्पादनांच्या किमती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच सणासुदीचा हंगाम महत्त्वाचा ठरणार आहे. या काळात वाहनांपासून इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपडे, सोने, घरगुती उपकरणे आणि प्रवास अशा विविध क्षेत्रांमध्ये मागणी वाढते. मागणीचा जोर आणि पुरवठ्यावरील दबाव एकाच वेळी निर्माण झाल्यास किमती आणखी वाढू शकतात. त्यामुळे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हे महागाईच्या दृष्टीने निर्णायक महिने ठरण्याची शक्यता आहे.

रिझर्व्ह बँकेसमोर व्याजदरवाढीचा पेच

या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या पुढील पतधोरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी व्याजदर वाढविण्याचा पर्याय असला, तरी त्याचे आर्थिक परिणामही लक्षात घ्यावे लागतील. व्याजदर वाढले की गृहकर्ज, वाहनकर्ज आणि उद्योगांसाठीचे कर्ज महागते. परिणामी ग्राहकांची खर्च करण्याची क्षमता आणि उद्योगांची गुंतवणूक काही प्रमाणात कमी होऊ शकते. याचा परिणाम एकूण मागणी आणि आर्थिक विकासाच्या गतीवर होण्याची शक्यता असते. त्यामुळे केवळ एक-दोन महिन्यांच्या महागाईच्या आकडेवारीवर आधारित आक्रमक व्याजदरवाढ करणे रिझर्व्ह बँकेसाठी योग्य ठरणार नाही. मात्र महागाईला सुरुवातीलाच आळा घातला नाही, तर ती अर्थव्यवस्थेत खोलवर रुजण्याचा धोका असतो. अशा वेळी पुढे अधिक कठोर उपाययोजना कराव्या लागू शकतात. या परिस्थितीत ऑक्टोबरमधील पतधोरण बैठकीत २५ आधारबिंदूंची मर्यादित व्याजदरवाढ करण्याचा पर्याय विचारात घेतला जाऊ शकतो. २५ आधारबिंदू म्हणजे ०.२५ टक्के. या मर्यादित वाढीमुळे सणासुदीच्या मागणीवर फार मोठा परिणाम होणार नाही; मात्र महागाई नियंत्रणाबाबत मध्यवर्ती बँक गंभीर असल्याचा संदेश बाजारपेठेला मिळू शकतो. त्यानंतरही महागाईचा वेग कायम राहिला, तर डिसेंबरमध्ये आणखी एक दरवाढ करण्याचा पर्याय खुला राहू शकतो. अर्थात, हा संभाव्य धोरणात्मक अंदाज असून अंतिम निर्णय प्रत्यक्ष महागाई, आर्थिक विकास, तेलाचे दर आणि उपलब्ध आकडेवारीवर अवलंबून असेल.

जागतिक अर्थव्यवस्थेलाही महागाईचा विळखा

महागाईचे संकट केवळ भारतापुरते मर्यादित नाही. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे ऊर्जा क्षेत्रातील अनिश्चितता वाढली असून विकसित अर्थव्यवस्थांनाही किंमतवाढीचा सामना करावा लागत आहे. युरोपीय मध्यवर्ती बँकेने १० सप्टेंबर रोजी व्याजदरात २५ आधारबिंदूंची वाढ केली. बँकेच्या अधिकृत अंदाजानुसार युरो क्षेत्रातील सरासरी महागाई २०२६ मध्ये तीन टक्के, २०२७ मध्ये २.५ टक्के आणि २०२८ मध्ये २.१ टक्के राहण्याची शक्यता आहे. ऊर्जा क्षेत्रातील महागाईचा परिणाम अन्य वस्तू आणि सेवांच्या किमतींवरही होऊ शकतो, असा इशारा बँकेने दिला आहे. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हनेही नुकतीच व्याजदरात ०.२५ टक्क्यांची वाढ केली आहे. महागाई नियंत्रणात आणण्याची गरज आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी व्याजदर कमी ठेवण्याची अपेक्षा, या दोन्ही बाबींमध्ये अमेरिकेलाही समतोल साधावा लागत आहे. जपानमध्येही व्याजदरवाढीची शक्यता चर्चेत आहे. त्यामुळे जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये स्वस्त कर्जाचे वातावरण लवकर निर्माण होण्याची अपेक्षा धूसर होत आहे.

गाभा महागाई वाढण्याची चिंता


अन्नधान्य आणि ऊर्जा या तुलनेने अस्थिर घटकांना वगळून मोजली जाणारी गाभा महागाईही चिंतेचा विषय ठरत आहे. ती जुलैमधील ३.९ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये ४.२ टक्क्यांपर्यंत वाढल्याचा विश्लेषकांचा अंदाज आहे. कच्च्या तेलाच्या किमती वाढत राहिल्या, कंपन्यांनी वाढलेला उत्पादन खर्च ग्राहकांकडे वळवला आणि सणासुदीच्या मागणीमुळे बाजारातील किमतींना आणखी आधार मिळाला, तर महागाई काही मोजक्या वस्तूंपुरती मर्यादित राहणार नाही. तिचा विस्तार अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत होण्याची शक्यता आहे. याच ठिकाणी रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणाची खरी कसोटी लागणार आहे. तेलाचे जागतिक दर किंवा मान्सूनचे प्रमाण हे रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणात नाही. व्याजदर वाढवून पाऊस पाडता येत नाही किंवा आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्चे तेल स्वस्त करता येत नाही. मात्र या बाह्य घटकांमुळे निर्माण झालेली महागाई अर्थव्यवस्थेत अधिक खोलवर पसरू नये, महागाईबाबतच्या अपेक्षा अनियंत्रित होऊ नयेत आणि कंपन्यांनी सातत्याने किंमतवाढ गृहीत धरून निर्णय घेऊ नयेत, यासाठी पतधोरण महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

सामान्यांच्या क्रयशक्तीची खरी परीक्षा

महागाईचा सर्वाधिक फटका सामान्य कुटुंबांच्या क्रयशक्तीला बसतो. उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसताना अन्नधान्य, इंधन, वाहतूक, कपडे आणि दैनंदिन वापराच्या वस्तू महागल्या, तर कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडते. उत्पन्नाचा मोठा भाग गरजेच्या वस्तूंवर खर्च होत असल्याने अन्य खर्चांना कात्री लावावी लागते. परिणामी बाजारातील मागणी कमी होऊन आर्थिक विकासावरही परिणाम होऊ शकतो. म्हणूनच अर्थव्यवस्थेचा विकास टिकवून ठेवण्यासाठी व्याजदर कमी ठेवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच महागाईला वेळीच आवर घालणेही आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेसमोर आता हाच समतोल साधण्याचे आव्हान आहे. आगामी काळात तेलाचे भाव, मान्सूननंतरचे अन्नधान्याचे चित्र आणि सणासुदीतील बाजारभाव यांवरून व्याजदरवाढीचे पुढील पर्व सुरू होणार की महागाईला काहीसा दिलासा मिळणार, याचे संकेत स्पष्ट होतील. मात्र एक गोष्ट निश्चित आहे, महागाईचा भार वाढत राहिला, तर त्याची किंमत सर्वसामान्य ग्राहकांनाच सर्वाधिक मोजावी लागेल.

काँक्रीटच्या जंगलात मातीचा श्वास गुदमरतोय!

माती वाचली तरच शहरे वाचतील, 'स्मार्ट सिटी'सोबत 'हेल्दी सिटी'चीही गरज



शहरांचा विकास म्हणजे केवळ उंच इमारती, रुंद रस्ते, भव्य पूल आणि आधुनिक सुविधांची उभारणी नव्हे. स्वच्छ हवा, सुरक्षित पाणी, मुबलक हिरवळ आणि जिवंत माती हीदेखील विकसित शहराची खरी ओळख आहे. मात्र, वेगाने वाढणारे शहरीकरण, बेसुमार काँक्रीटीकरण, कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि रासायनिक प्रदूषण यामुळे शहरांच्या जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे 'माती वाचवा' ही संकल्पना आता केवळ शेतीपुरती मर्यादित न ठेवता शहरांच्या भविष्यातील नियोजनाचा केंद्रबिंदू बनविण्याची वेळ आली आहे. कारण मातीचा श्वास गुदमरला, तर शहरांचे पर्यावरणही संकटात सापडेल.

वर्षा डावरे

माती ही शाश्वत विकासाचा मूलभूत आधार आहे. ती केवळ झाडांना आधार देणारे माध्यम नाही, तर पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, भूजल पुनर्भरणास मदत करणे, सूक्ष्मजीव आणि जैवविविधता टिकविणे तसेच स्थानिक पर्यावरणाचा समतोल राखणे अशा अनेक महत्त्वाच्या भूमिका बजावते. परंतु शहरांमध्ये मोकळ्या जमिनीचे क्षेत्र कमी होत असून काँक्रीटचे आवरण वाढत आहे. परिणामी मातीच्या नैसर्गिक प्रक्रियांवर विपरीत परिणाम होत आहे. विकासाच्या नावाखाली जमिनीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने झाकण्याची प्रवृत्ती भविष्यात शहरांसाठी घातक ठरू शकते.

» हिरवळ वाढवा, मातीला जिवंत ठेवा : शहरातील मोकळ्या जागा, गृहनिर्माण सोसायट्यांचे परिसर, शाळा-महाविद्यालयांची आवारे, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणी नियोजनपूर्वक हिरवळ वाढविणे आवश्यक आहे. स्थानिक प्रजातींची झाडे, फुलझाडे, भाजीपाला बागा आणि सामुदायिक उद्याने यामुळे केवळ शहराचे सौंदर्य वाढत नाही, तर पर्यावरणीय संतुलन राखण्यासही मदत होते. शहरी हिरवळ टिकविण्यासाठी सेंद्रिय कचऱ्याचा योग्य वापर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. घरातील स्वयंपाकघरातील ओला कचरा, बाजारपेठेतील भाजीपाल्याचे अवशेष आणि बागेतील पालापाचोळा यांचे वर्गीकरण करून स्थानिक पातळीवर कंपोस्ट तयार करता येते. हे खत उद्याने, वृक्षलागवड आणि घरगुती बागांसाठी वापरल्यास कचरा व्यवस्थापन आणि माती संवर्धन या दोन्ही समस्यांवर एकाच वेळी उपाय मिळू शकतो.

» कचरा नव्हे, मातीसाठी मौल्यवान संसाधन! : सेंद्रिय पदार्थ हे मातीच्या आरोग्याचे प्रमुख आधार आहेत. कंपोस्ट, गांडूळखत आणि अन्य जैविक निविष्ठांचा वापर वाढविल्यास मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण सुधारण्यास, सूक्ष्मजीवांचे संवर्धन करण्यास आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविण्यास मदत होते. आज शहरांमधील कचरा गोळा करून दूरवर नेणे आणि त्याची विल्हेवाट लावणे यासाठी मोठा खर्च केला जातो. त्याऐवजी ओल्या कचऱ्यावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून त्यापासून खतनिर्मिती केली, तर वाहतूक आणि विल्हेवाटीचा खर्च कमी होऊ शकतो. त्याचबरोबर शहरी उद्याने आणि वृक्षसंवर्धनासाठी नैसर्गिक खत उपलब्ध होईल. म्हणजेच कचऱ्याचे रूपांतर संसाधनात करण्याची 'कचऱ्यातून संपत्ती' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवता येईल.

» काँक्रीटीकरणाचा अतिरेक शहरांसाठी धोक्याची घंटा : शहरातील प्रत्येक मोकळी जागा काँक्रीटने झाकण्याची प्रवृत्ती भविष्यात मोठ्या संकटाला आमंत्रण देणारी आहे. जमिनीवर काँक्रीटचे आवरण वाढले की पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची नैसर्गिक क्षमता कमी होते. त्यामुळे भूजल पुनर्भरणावर परिणाम होतो. पावसाळ्यात पाणी साचणे, नाले तुडुंब भरणे आणि शहरी पुराचा धोका वाढणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. यावर उपाय म्हणून शहर नियोजनात पाणी जमिनीत मुरू देणारे पारगम्य पृष्ठभाग, रेन गार्डन, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करणाऱ्या व्यवस्था, जलसंधारण क्षेत्रे आणि हरित पट्टे यांना प्राधान्य दिले पाहिजे. विकासकामे करताना जमिनीची नैसर्गिक पाणी शोषून घेण्याची क्षमता नष्ट होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी केवळ नियोजन यंत्रणांची नसून नागरिकांचीही आहे.

» मातीचे आरोग्य बिघडले तर शहरांचे तापमान वाढेल : हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर माती संवर्धनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. शहरांमधील हिरवळ कमी होऊन काँक्रीटीकरण वाढल्यास उष्णतेचे प्रमाण वाढण्याचा धोका असतो. याउलट झाडे, मोकळी माती आणि हरित क्षेत्रे टिकवून ठेवल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास आणि स्थानिक पर्यावरणीय संतुलन राखण्यास मदत होते. त्यामुळे भविष्यातील शहरांच्या विकासाचे मूल्यमापन केवळ रस्ते, इमारती, पूल आणि पायाभूत सुविधांच्या आधारे करता येणार नाही. जमिनीचे आरोग्य, हरित क्षेत्रांचे प्रमाण, पावसाच्या पाण्याचे संधारण आणि भूजल पुनर्भरण तसेच जैवविविधतेचे संवर्धन हेही विकासाचे महत्त्वाचे निकष ठरले पाहिजेत. शहराचा विकास किती झाला, यापेक्षा तो निसर्गाशी किती सुसंगत आहे, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

» 'निरोगी माती, निरोगी शहरे' हीच विकासाची नवी दिशा : 'हेल्दी सॉइल्स फॉर हेल्दी सिटीज' अर्थात 'निरोगी माती, निरोगी शहरे' ही संकल्पना केवळ पर्यावरणपूरक घोषणा न राहता शहर विकासाचे धोरण बनले पाहिजे. यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, बचत गट आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळेत 'माझी शाळा-माझी माती' हा उपक्रम राबविता येईल. विद्यार्थ्यांना कंपोस्टनिर्मिती, वृक्षसंवर्धन, मातीची गुणवत्ता, जैवविविधता आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याच्या पद्धती यांचे प्रात्यक्षिक ज्ञान देता येईल. महाविद्यालयांनी माती परीक्षण, शहरी शेती, जैविक कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधता संवर्धन यासंबंधी अभ्यास व प्रकल्प हाती घ्यावेत. स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रत्येक प्रभागात सामुदायिक कंपोस्टिंग केंद्रे, शहरी बागा, हरित पट्टे आणि माती संवर्धन प्रकल्प उभारण्यावर भर द्यावा. बचत गटांना कंपोस्ट, गांडूळखत आणि सेंद्रिय निविष्ठा निर्मितीचे प्रशिक्षण दिल्यास पर्यावरण संवर्धनासोबत स्थानिक रोजगाराच्या संधीही निर्माण होऊ शकतात.

» नागरिकांचा सहभागच बदलाची खरी ताकद : शहरांचे पर्यावरण वाचविण्याची जबाबदारी केवळ शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची नाही. प्रत्येक नागरिकाची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. घरातील ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, शक्य असल्यास घरच्या घरी कंपोस्ट तयार करणे, झाडांचे संवर्धन करणे, अनावश्यक काँक्रिटीकरण टाळणे आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी प्रयत्न करणे अशा छोट्या कृतींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. प्रत्येक नागरिकाने स्वतःला 'मातीचा संरक्षक' मानले, तर शहरांच्या विकासाची दिशा बदलू शकते. कारण मातीचे आरोग्य चांगले असेल, तरच हिरवळ, पाणी, जैवविविधता आणि मानवी जीवनमान यांचे आरोग्य टिकवता येईल. मातीचे संवर्धन ही केवळ पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नसून शहरात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या भवितव्याशी जोडलेली बाब आहे.

स्मार्ट सिटी नव्हे, आधी 'हेल्दी सिटी'!

आपण पुढच्या पिढीला केवळ आधुनिक तंत्रज्ञानाने सजलेली 'स्मार्ट सिटी' देणार आहोत की निरोगी, हिरवीगार आणि शाश्वत शहरे देणार आहोत, हा आजचा मूलभूत प्रश्न आहे. स्मार्ट शहराची खरी ओळख केवळ उंच इमारती, रुंद रस्ते किंवा डिजिटल सुविधांमध्ये नसते. निरोगी माती, सुरक्षित पाणी, मुबलक हिरवळ, स्वच्छ हवा आणि पर्यावरणाबाबत जागरूक नागरिक हेच तिच्या विकासाचे खरे मापदंड असले पाहिजेत. शहरांचा विकास निसर्गाला संपवून होऊ शकत नाही. काँक्रीटच्या जंगलात मातीचा श्वास कायम ठेवायचा असेल, तर आजच नियोजन, धोरण आणि नागरिकांच्या कृतीत बदल घडवावा लागेल. कारण माती वाचली तरच पाणी वाचेल, हिरवळ टिकेल आणि शहरेही सुरक्षित राहतील.



प्रकाशाचा हा सण आपल्या जीवनात
सुख, समृद्धी, आरोग्य आणि यश घेऊन येवो,
हीच दिवाळीच्या निमिताने
मन:पूर्वक शुभेच्छा..!

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा









● शुभेच्छुक : श्री प्रविण सखारामजी देशमुख (नगराध्यक्ष प्र.नगरपंचायत अर्धापूर)





घरात लक्ष्मीचा निवास,
अंगणी दिव्यांची आरास
मनाचा वाढवी उल्हास,
दिवाळी असो ही खास!

शुभ दीपावली

दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!





संजय देशमुख लहानकर

सभापती,नांदेड कृषि उत्पन्न बाजार समिती नांदेड



बलिप्रतिपदा दिपावली पाडवा

निमित्त हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छूक :-

बालाजी पाटील गव्हाणे

भाजपा तालुकाध्यक्ष, अर्धापूर



दिवाळी

पाडवा निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छूक :-
ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्था वंसतनगर नांदेड
ज्ञानवर्धिनी विद्यालय हमरापुर अर्धापूर



वंदना राजेश शिरफूले
अध्यक्ष



प्रा.राजेश निळकंठराव शिरफूले
सचिव



दीपावली पाडवा

सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा..!










* शुभेच्छूक :-
सखाराम क्षीरसागर
तालुकाध्यक्ष मराठी पत्रकार संघ,अर्धापूर
पत्रकार दैनिक गोदातीर समाचार, SK मराठी व्यूज वेटवर्क



शुभ दीपावली

दीपावलीचा सण प्रत्येकाच्या
जीवनात आनंद, समृद्धी
आणि शांती घेऊन येवो.

सचिन कल्याणकर
जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा,
नांदेड उत्तर

तुम्हाला आणि तुमच्या
परिवाराला खूप खूप
शुभ दीपावली!

दीपावलीचा प्रकाश तुमचे
जीवन आनंद, यश आणि
सकारात्मकतेने भरून टाको.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



राजश्री पब्लिक स्कुल
लातुर रोड, नांदेड


दिलीप पाटील गणेशपूरकर
सचिव


ॲड. विद्यासागर तोरणेकर
औरंगाबाद


रघुनाथ जाधव
माजी उपाध्यक्ष
जि.प. बिदर


सुशांत तोरणेकर
व्यवस्थापक
राजश्री पब्लिक स्कुल

Apsara®
Ice Creams
Since 1971
Mumbai's Most Popular Brand
भाग्यनगर - आनंदनगर रोड
(आईनाथ पाणीपुरीच्या बाजुला) नांदेड. मो : 8454047410



दीपावलीच्या



हार्दिक शुभेच्छा!

Happy Diwali



शुभेच्छूक :

राजेश पावडे
सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

शुभ दिपावली



संपदा व्यायाम अणि बहुउद्देशीय मंडळ
अमरावती



Happy Diwali

नवी स्वप्ने, नवी क्षितिजे, घेवून येवो ही दिवाळी,
ध्येयार्पण प्रयत्नांना, दिव्य यशाची मिळो झळाळी,
आयुष्यात सोनेरी क्षण घेऊन
येवो ही दिवाळी !!

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा



सौ. श्यामला भगवानराव देशमुख
श्री भगवानराव देशमुख

• शुभेच्छूक : नारायण श्रीमनवार



शुभ दीपावली

सर्वांना दीपावली च्या हार्दिक शुभेच्छा

सर्व आनंद
सर्व सौख्य
सर्व स्वप्नांची पूर्तता
यशाची सर्व शिखरं
सर्व ऐश्वर्य
आपणास लाभो
ही दिपावली आपल्या
आयुष्याला एक नवा
उजाळा देवो...



:: शुभेच्छुक ::
चैतन्यबापू देशमुख
प्रदेश उपाध्यक्ष
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

दीपावलीच्या



हार्दिक शुभेच्छा!

Happy Diwali

मा. शेषराव चव्हाण
माजी सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय बंजारा सेवा संघ, मुंबई



स्वप्नील चव्हाण
माजी सभापती,
समाज कल्याण जि.प. नांदेड



सौ.वैशालीताई चव्हाण
माजी अध्यक्षा, जि.प., नांदेड



सुशांत चव्हाण
माजी सभापती, कृउबास, मुखेड

आमच्या असंख्य ग्राहक,
शेतकरी व नागरिकांना
दिपावली पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
हॉटेल आरवी बार ॲन्ड रेस्टॉरंट
कुंडलवाडी रोड बिलोली

उदय हार्डवेअर
बोधन रोड बिलोली
च्या वतीने
आमच्या असंख्य ग्राहक,
शेतकरी व नागरिकांना
दिपावली पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
आनंद शंकरराव चंचलाड
व समस्त चंचलवाड परिवार

आमच्या असंख्य ग्राहक,
शेतकरी व नागरिकांना
दिपावली पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
स्वरूप खंडेराय
हॉटेल निसर्ग बार अँड रेस्टॉरंट
बोधन रोड बिलोली

भारतीय जनता पार्टी,
महानगर नांदेड

स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला,
सौख्य समृद्धी लाभो तुम्हाला
दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हा | दि | क | शु | भे | च्छा !

शुभेच्छुक
सौ. कविता संतोष मुळे
महापौर, मनपा, नांदेड
संतोष व्यंकटराव मुळे
उपाध्यक्ष, भाजपा, महानगर नांदेड

दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
9225752111
24 तास मेडिकल
& कॉस्मेटिक्स
एसबीआय बँकेसमोर, कला मंदिर, डॉक्टर लाईन, नांदेड
Deal in All Types of Life Saving & Regular Medicine
- Anti Cancer Medicines
- IVF Treatment Medicine
- Kidney Transplant Medicines
- Liver Transplant Medicines
- All Company Speciality
- Range Available
- All Antibiotic Injection
- All Critical Care Medicines
- All Virology / HIV Medicines
- All Gynae, Cardiac,
- Anti Fungal Gastro Injection
- All Vaccines Available
- All Blood Products
एसबीआय बँकेसमोर, कला मंदिर, डॉक्टर लाईन, नांदेड
नांदेड जिल्हा सर्वत्र कुरियर सेवा फ्री मध्ये उपलब्ध

महाराष्ट्र राज्य
शिक्षक सेना नांदेड
च्या वतीने दिपावली निमित्त
हार्दिक शुभेच्छा!
दिवाळी
: शुभेच्छुक :
संतोष अंबुलगेकर,
जिल्हाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, नांदेड.
सर्व जिल्हा पदाधिकारी व महिला पदाधिकारी, सर्व
तालुका पदाधिकारी व सर्व संघटक शिक्षक सेना नांदेड


दीपावली
निमित्त
सर्व शेतकरी, ऊस उत्पादक सभासद व अहमदपूर, चाकूर, लोहा, कंधार, उदगीर, जळकोट, पालम व गंगाखेड तालुक्यांतील जनतेस
सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड
तर्फे हार्दिक शुभेच्छा!
अविनाश जाधव
मॅनेजिंग डायरेक्टर
सौ. दिपाली जाधव
डायरेक्टर
सुरज पाटील
डायरेक्टर
पी.जी. होनराव
व्हाईस प्रेसिडेंट
कारखान्याची ठळक वैशिष्ठे
शुभ दिपावली
कारखान्याची गाळप क्षमता ४००० टी.सी.डी./प्रतिदिन.
६० के. एल.पी.डी. आसवणी प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला आहे.
शुभ्र व दाणेदार साखर उत्पादन.
अल्पदरात ऊस रोपे पुरवठा, ऊस विकासासाठी विशेष मार्गदर्शन, दर्जेदार बेणेचा पुरवठा, ठिबक सिंचन योजना
कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट मार्फत द्वितीय तांत्रीक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर-पूर्व विभागातुन) दिनांक १०.०३.२०१७ रोजी मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, तत्कालीन मुख्यमंत्री (म.रा.) व मा.श्री.शरदचंद्रजी पवार माजी केंद्रिय कृषी मंत्री, भारत सरकार यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.
कारखान्यास भारतीय शुगर या मासीका तर्फे सर्वोत्तम पुर्नरचना पुरस्कार (देशपातळीवरचा) दि.०८.०७.२०१६ रोजी साखर संघाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. शिवाजीराव नागवडे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.


आपणास व
आपल्या
परिवारास
दीपावली
निमित
हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक : करीम भाई शेख
उपनगराध्यक्ष न.प.लोहा


दिपावली
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!
: शुभेच्छुक :
माधुरी राजेश बोडके
नगरसेवीका न.प.लोहा


दिपावली
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!
: शुभेच्छुक :
हरीभाऊ यशवंतराव चव्हाण
नगरसेवक न.प.लोहा



Govt. Registred Electrical Contractor
* All Types of Electrical Material Suppliers
* All Types of Transformers Suppliers
* Errection of S/S, DTC, HT,LT Lines & U/G All Types of Cables
* Authorized Dealer for Solar Street Light & Appliances.
* E-mail:Anujkandhar@gmail.com

Reg. MC No. 22104
Reg. M.S. No. 43733
GST IN: 27AYGPP9423Q2ZI
MSEDCL Vendor No.: 100021141Mob. 9764668960
9960081000

M/s. Anuj Electricals

Office : Sambhaji Nagar, Kandhar Tq. Kandhar Dist. Nanded-431714 (M.S.)



महाराष्ट्र पोलिस

नांदेड जिल्हा पोलिस

सत्यमेव जयते

चोरी पासून सावधान!

सतर्क नागरिक, सुरक्षित घर, सुरक्षित परिवार



घरफोडी पासून सावध रहा!

गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवा. कोणतीही संशयास्पद घटना त्वरित पोलीसांना कळवा.

घरफोडी टाळण्यासाठी सोपे उपाय

- घराला मजबूत कुलुप लावा.
- दरवाजे, खिडक्या व ग्रील सुरक्षित करा.
- घराच्या बाहेर योग्य प्रकाश व्यवस्था ठेवा.
- शेजाऱ्यांशी चांगले संबंध ठेवा. संशयास्पद व्यक्ती / हालचाल दिसल्यास लक्ष द्या.
- प्रवासावर जाताना शेजाऱ्यांना किंवा विश्वासू व्यक्तींना माहिती द्या.
- मोलाचे दागिने, रोकड, कागदपत्रे सुरक्षित ठिकाणी ठेवा.
- CCTV कॅमेरे व अलर्म सिस्टमचा वापर करा.

सतर्क रहा, सुरक्षित रहा !

सतर्कता हीच सुरक्षेकेची पहिली पायरी

- घर रिकामे ठेवू नका.
- घराची चावी विश्वासू व्यक्तींनाच द्या.
- अनोळखी व्यक्तींना घरात प्रवेश देऊ नका.
- संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित 112 वर संपर्क करा.
- समाजात जागरुकता वाढवा, एकत्र राहा, सुरक्षित राहा.

24/7 आपली सतर्कता हीच नांदेड शहराची सुरक्षितता !

CONTROL ROOM - 02462-234720
pronanded@gmail.com

E-mail Id
sp.nanded@mahapolice.gov.in
pronanded@gmail.com

संपर्क पोलीस अधीक्षक, नांदेड - नियंत्रण कक्ष - 02462234720, +919975629251

महाराष्ट्र पोलिस

नांदेड जिल्हा पोलिस

सत्यमेव जयते

वाहन अपघात टाळा, जीव वाचवा !



जीवन अमूल्य आहे, सुरक्षा हीच आपली शहाणपणाची खरी खूण !

अपघात क्षणात होतो, पण परिणाम आयुष्यभर भोगावा लागतो.

सुरक्षित वाहन चालवण्यासाठी पाळा हे नियम

- नेहमी सीट बेल्ट लावा, प्रत्येक सीटवर सर्वांनी लावणे आवश्यक आहे.
- दुचाकी चालवताना आणि बसताना हेल्मेटचा वापर करा.
- वेग मर्यादित ठेवा, अति वेग हा अपघाताचे प्रमुख कारण आहे.
- मोबाईलवर बोलू नका, मेसेज करू नका. लक्ष रस्त्यावर ठेवा.
- दारू पिऊन वाहन चालवणे जीवघेणे आहे. 'ड्रिंक नको - ड्राईव्ह नको'
- वाहतूक नियमांचे पालन करा, सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग व चिन्हे पाळा.

सुरक्षित आपण - सुरक्षित आपले कुटुंब - सुरक्षित समाज

सीट बेल्ट लावा | हेल्मेट वापरा | वेग मर्यादित ठेवा | मोबाईल वापर टाळा | दारू पिऊन वाहन चालवू नका | वाहतूक नियमांचे पालन करा

"सावधान रहा ! सुरक्षित रहा !
आपण जपलात नियम, तर अपघात राहील दूर."

आपत्कालीन सहाय्यासाठी 112

अपघात झाल्यास तात्काळ कॉल करा - 112
वेळीच मदत, जीव वाचवते !

nandedpolice

जनसंपर्क कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

नियम पाळा, अपघात टाळा, सुरक्षित जीवन जगा !

नांदेड जिल्हा पोलिस

आपली सुरक्षा... आमची जबाबदारी...

जातीय सलोखा

आपली ताकद, आपली ओळख !

"धर्म, भाषा, जात वेगळी असली तरी आपण सारे भारतीय एकच आहोत. एकमेकांचा सन्मान करूया, शांतता आणि सलोखा जपूया."

- भेदभाव नको, बंधुभाव हवा
- एकतेतूनच प्रगतीचा मार्ग
- परस्परांचा सन्मान, समाजाचा अभिमान
- शांतता, सहिष्णुता आणि जातीय सलोखा हाच खरा देशभक्तीचा मार्ग

चला, जातीय भेद विसरून
एकत्र येऊया आणि नांदेडला बनवूया
एकता, शांतता आणि प्रगतीचे उदाहरण !

- आम्ही वचन देतो जातीय भेदभाव करणार नाही
- आम्ही वचन देतो सर्व धर्मीचा आदर करू
- आम्ही वचन देतो शांतता आणि सदुभावना जपू
- आम्ही वचन देतो कायद्यांचे पालन करून सुरक्षित समाज घडवू

"एकता आपल्या विविधतेत, शक्ती आपल्या एकतेत."

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष - 02462234720, +919975629251

नांदेड जिल्हा पोलीस

सायबर फसवणूक पासून सावधान!

फिशिंग कॉल | ओटीपी फसवणूक | बँक फसवणूक | लिंक / APK फसवणूक

जागरूक नागरिक... सुरक्षित भविष्य!

सायबर फसवणूक झाल्यास त्वरित तक्रार करा

राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टल
www.cybercrime.gov.in
Ministry of Home Affairs
Government of India

- ऑनलाइन तक्रार नोंदवा
- तक्रारीचा संदर्भ क्रमांक मिळवा
- तक्रारीचा मागोवा घ्या
- त्वरित कारवाईस मदत करा

काय कराल?

- अज्ञात नंबरवरून आलेल्या कॉल्स, मेसेज व लिंकवर विश्वास ठेवू नका.
- OTP, पासवर्ड, CVV, PIN कोणालाही सांगू नका.
- अनोळखी वेबसाईटवर खरेदी करू नका.
- कोणतीही संशयास्पद बाब लक्षात आल्यास त्वरित तक्रार करा.
- आपली वैयक्तिक व बँकिंग माहिती सुरक्षित ठेवा.

तत्काळ मदतीसाठी DIAL 112 आपत्कालीन सेवा

सायबर फसवणूक झाल्यास संपर्क करा

सायबर हेल्पलाइन	महिला हेल्पलाईन	चाईल्ड हेल्पलाईन
1930	181	1098

एक क्षणाची बेपर्वाई... आयुष्यभराची कमाई घालवू शकते!

सावधान रहा... सुरक्षित रहा... सायबर फसवणुकीला बळी पडू नका!

नांदेड जिल्हा पोलीसांची सायबर सुरक्षा सेवा

सायबर हेल्पलाइन	सायबर पेट्रोलिंग	सायबर जनजागृती	तक्रार नोंदणी मदत	डिजिटल सुरक्षा मार्गदर्शन
तांत्रिक मदत व मार्गदर्शन	ऑनलाइन गुन्हे शोध व प्रतिबंध	शाळा, महाविद्यालय व नागरिकांमध्ये जनजागृती	ऑनलाइन तक्रार नोंदविण्यास सहाय्य	आपली माहिती सुरक्षित कशी ठेवावी

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष - 02462234720, +919975629251

नांदेड जिल्हा पोलिस

आपली सुरक्षा... आमची जबाबदारी...

महिला सुरक्षा

आपला अधिकार... आमचे कर्तव्य!

सशक्त महिला सुरक्षित समाज

आम्ही आहोत तुमच्या पाठीशी !

आपत्कालीन संपर्क क्रमांक	महिला हेल्पलाईन	चाईल्ड हेल्पलाईन	सायबर हेल्पलाईन	साईबर गुन्हे तक्रार
112 आपत्कालीन सेवा	181 त्वरित मदत	1098 मुलांसाठी मदत	1930 सायबर मदत	www.cybercrime.gov.in ऑनलाईन तक्रार नोंदवा

महिलांच्या सुरक्षिततेसाठी नांदेड पोलीसांची विशेष पथक

दामिनी पथक	निर्भया पथक	महिला डेस्क	समुपदेशन सुविधा	कायदेशीर मदत
महिलांच्या सुरक्षेसाठी सदैव सज्ज	महिला तक्रारींसाठी जलद व प्रभावी मदत	प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिलांसाठी स्वतंत्र डेस्क	गैरजेनुसार समुपदेशन आणि मार्गदर्शन	कायदेशीर हक्कांची माहिती आणि मदत

आपली सुरक्षा... आपल्या हातात

- अनोळखी व्यक्तींशी सतर्क रहा.
- संशयास्पद परिस्थितीत त्वरित पोलीसांना संपर्क साधा.
- आपला प्रवास, माहिती आणि लोकेशन विश्वासातील व्यक्तींना कळवा.
- रात्रीच्या वेळी एकट्या प्रवास टाळा.
- महिला सुरक्षा ॲप डाऊनलोड करा आणि आपत्कालीन बटनचा वापर करा.

महिला सुरक्षा ॲप डाऊनलोड करा आणि आपत्कालीन बटनद्वारे तत्काळ मदत मिळवा.

भीऊ नका... आवाज उठा ! सुरक्षित रहा... निडर बना !

महिला सशक्तीकरण... समाज प्रगतीचे लक्षण!

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष - 02462234720, +919975629251

महाराष्ट्र पोलिस

नांदेड जिल्हा पोलिस

आपली सुरक्षा... आमची जबाबदारी...

वाहन चोरी प्रतिबंध

सावध रहा... सुरक्षित रहा...

घ्या ही काळजी...

- वाहन नेहमी लॉक करुनच पार्क करा.
- वाहनातून बाहेर पडताना किल्ली काढून घ्या.
- सार्वजनिक व CCTV असलेल्या ठिकाणीच वाहन पार्क करा.
- दुचाकीस डिस्क लॉक / चेन लॉक यांचा वापर करा.
- वाहनांचे कागदपत्रे (RC, Insurance) नेहमी सोबत ठेवा.
- शक्य असल्यास GPS / ट्रॅकिंग डिव्हाईस बसवा.
- संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल दिसल्यास त्वरीत पोलिसांना कळवा.



लॉक करा आणि वाहन सुरक्षित ठेवा!

सावधगिरी हीच सर्वोत्तम सुरक्षा!

काहीही संशयास्पद दिसल्यास त्वरीत संपर्क साधा DIAL 112

चोरीला आळा | आपली मालमत्ता सुरक्षित | सुरक्षित समाज, सुरक्षित नांदेड

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष - 02462234720, +919975629251

महाराष्ट्र पोलिस

नांदेड जिल्हा पोलिस

आपली सुरक्षा... आमची जबाबदारी...

CEIR PORTAL

CEIR CENTRAL EQUIPMENT IDENTITY REGISTER

भारत सरकारचा उपक्रम

मोबाईल हरवला किंवा चोरीला गेला?
ताबडतोब CEIR वर नोंदणी करा !



CEIR चे फायदे

- हरवलेला / चोरीला गेलेला मोबाईल ब्लॉक करा
- IMEI द्वारे मोबाईलचा मागोवा घेण्यास मदत
- मोबाईलचा गैरवापर रोखता येतो
- मोबाईल सापडल्यानंतर पुन्हा अनब्लॉक करण्याची सुविधा
- हरवलेल्या मोबाईलच्या शोधासाठी पोलिसांना तांत्रिक मदत मिळते.

मोबाईल हरवल्यास काय कराल?

1. जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार / ई-एफआयआर करा.
2. मोबाईलचा IMEI क्रमांक जवळ ठेवा.
3. CEIR Portal वर मोबाईल ब्लॉक करण्यासाठी अर्ज करा.
4. अर्जाची स्थिती ऑनलाईन तपासा.

लक्षात ठेवा
- मोबाईलचे IMEI क्रमांक आधीच सुरक्षित ठेवा.
- मोबाईल हरवल्यास विलंब न करता तक्रार नोंदवा.
- CEIR वर नोंदणी केल्यास मोबाईलचा गैरवापर रोखण्यास मदत होते.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत DIAL 112 वर संपर्क साधा

आपली सुरक्षा | आपला विश्वास | नांदेड जिल्हा पोलीस सदैव आपल्या सेवेत

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष : 02462-234720 | 112

दीपोत्सव

पाठीवर दप्तराचे ओझे, डोक्यावर अपेक्षांचा भार!

सरकारी नियम कागदावरच, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न कायम

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी सरकारकडून वेळोवेळी नियम, मार्गदर्शक सूचना आणि विविध उपाययोजना जाहीर केल्या जातात. मात्र, प्रत्यक्ष शाळांमध्ये या उपाययोजनांची अंमलबजावणी कितपत होते, हा प्रश्न आजही कायम आहे. पुस्तके, वह्या, कार्यपुस्तिका, संदर्भसाहित्य आणि अन्य शैक्षणिक साधनांनी भरलेले जड दप्तर रोज पाठीवर वाहणे ही विद्यार्थ्यांची जणू अपरिहार्य जबाबदारीच बनली आहे. ज्ञानाचे ओझे वाढविण्याच्या नादात बालपणावर शारीरिक ओझे लादले जात आहे, ही चिंतेची बाब आहे.

प्रा. सुनेत्रा केरे

आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक परीक्षेत उत्तम गुण मिळवावेत, अशी अपेक्षा पालकांपासून शाळांपर्यंत सर्वांचीच असते. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, यासाठी विविध विषयांची पुस्तके, वह्या, सराव पुस्तिका आणि संदर्भसाहित्य दिले जाते. त्यातच गृहपाठ, वर्गकार्य आणि अतिरिक्त उपक्रमांची भर पडते. परिणामी विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन दिवसेंदिवस वाढत जाते. ज्ञान मिळविण्याच्या प्रक्रियेत दप्तराचे ओझे इतके वाढते की ते पेलणेच विद्यार्थ्यांसाठी आव्हान ठरते.

जड दप्तराचा आरोग्यावर परिणाम

दप्तराचे अतिरिक्त वजन ही केवळ गैरसोय नसून लहान मुलांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर बाब आहे. सतत जड दप्तर वाहिल्याने खांदे, मान आणि पाठीच्या स्नायूंवर ताण येऊ शकतो. पाठदुखी, मानदुखी, खांदेदुखी आणि लवकर थकवा येणे अशा तक्रारी उद्भवू शकतात. दप्तर चुकीच्या पद्धतीने किंवा एका खांद्यावर वाहिल्यास शरीराच्या ठेवणीतही अस्वस्थता निर्माण होऊ शकते. शाळेत जाण्या-येण्याच्या प्रवासातच विद्यार्थ्यांची ऊर्जा खर्च होत असेल, तर वर्गात अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण होणारच. शारीरिक थकवा आणि अस्वस्थतेचा परिणाम त्यांच्या एकाग्रतेवर, सहभागावर आणि शिकण्याच्या आनंदावर होऊ शकतो. त्यामुळे दप्तराचे वजन कमी करणे ही केवळ शैक्षणिक प्रशासनाची जबाबदारी नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाची गरज आहे.

सरकारी नियम आहेत; अंमलबजावणीचे काय?

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझे कमी करण्यासाठी केंद्र सरकारने 'स्कूल बॅग पॉलिसी २०२०'च्या माध्यमातून मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन त्यांच्या शरीराच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक नसावे, अशी शिफारस करण्यात आली आहे. या तत्त्वांच्या अनुषंगाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागानेही शाळांसाठी विविध सूचना केल्या आहेत. इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षातून दहा दिवस दप्तरविरहित ठेवण्याची संकल्पना मांडण्यात आली आहे. या दिवशी विद्यार्थ्यांना अनुभवाधारित, कृतीप्रधान आणि प्रत्यक्ष सहभागातून शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. पुस्तकांच्या चौकटीबाहेर जाऊन परिसरातील अनुभव, कौशल्ये आणि प्रत्यक्ष कृती यांच्या माध्यमातून शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक अर्थपूर्ण भर पडू शकते. मात्र, अशा उपक्रमांची अंमलबजावणी सर्व शाळांमध्ये प्रभावीपणे होतेच असे नाही. शाळांनी वर्गनिहाय वेळापत्रकाचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. संबंधित दिवशी आवश्यक असलेली पुस्तके आणि वह्याच विद्यार्थ्यांनी आणाव्यात, याची दक्षता घेतली पाहिजे. शक्य असेल तेथे डिजिटल शैक्षणिक साधनांचा वापर करावा. मात्र, त्यासाठी आवश्यक सुविधा सर्व विद्यार्थ्यांकडे उपलब्ध आहेत का, याचाही विचार करणे गरजेचे आहे.

शाळांची जबाबदारीही महत्त्वाची



दप्तराचे वजन कमी करण्यासाठी शाळा व्यवस्थापनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी सुरक्षित कपाटे किंवा वर्गातील स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिल्यास रोज सर्व पुस्तके घरी नेण्याची गरज कमी होऊ शकते. वेळापत्रकानुसार आवश्यक साहित्य आणण्याच्या सूचना द्याव्यात. वह्यांची संख्या आणि आकार मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वेळोवेळी वजन तपासून ते त्यांच्या शरीराच्या वजनाच्या तुलनेत योग्य आहे की नाही, हे पाहावे. यासाठी शाळेत वजनकाटा उपलब्ध असणे उपयुक्त ठरू शकते. गृहपाठ देतानाही अनावश्यक वह्या-पुस्तकांची ने-आण होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. वर्गकार्य आणि गृहपाठाचे नियोजन करताना विद्यार्थ्यांच्या वयाचा, क्षमतेचा आणि आरोग्याचा विचार होणे आवश्यक आहे. मात्र, दप्तराचे वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत शाळांसमोरही काही अडचणी आहेत. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र पाठ्यपुस्तक, कार्यपुस्तिका आणि सराव पुस्तिका असल्याने दप्तरातील साहित्य कमी करणे सहज शक्य होत नाही. विज्ञान, गणित, चित्रकला, हस्तकला आणि कार्यानुभव यांसारख्या विषयांसाठी वेगवेगळे साहित्य आणावे लागते. शिवाय, प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांची पुस्तके आणि अन्य शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा किंवा स्वतंत्र कपाटांची सुविधा उपलब्ध असेलच असे नाही. डिजिटल शिक्षण हा दप्तराचे वजन कमी करण्याचा एक पर्याय असू शकतो; परंतु प्रत्येक विद्यार्थ्याकडे संगणक, टॅबलेट किंवा स्मार्टफोन आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे डिजिटल शिक्षणावर पूर्णपणे अवलंबून राहणेही व्यवहार्य ठरणार नाही. शाळांनी उपलब्ध साधनसामग्री आणि विद्यार्थ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन पर्याय शोधणे आवश्यक आहे.

पालकांची दक्षताही तितकीच आवश्यक

विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन कमी करण्यामध्ये पालकांची भूमिका दुर्लक्षित करून चालणार नाही. अनेकदा मुले दप्तर भरताना निष्काळजीपणा करतात. कधी सर्व विषयांच्या वह्या-पुस्तकांसह खेळणी, अनावश्यक वस्तू किंवा अतिरिक्त साहित्यही दप्तरात ठेवतात. त्यामुळे पालकांनी रोज दुसऱ्या दिवसाच्या वेळापत्रकानुसार दप्तर तपासणे आवश्यक आहे. विशेषतः आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या दप्तरात अनेक विषयांचे साहित्य असते. त्यामुळे कोणत्या दिवशी कोणती पुस्तके आणि वह्या आवश्यक आहेत, याची खात्री पालकांनी करावी. अनावश्यक साहित्य काढून टाकावे. मुलांसाठी दप्तर निवडतानाही त्याचे वजन, आकार, खांद्यांवर व्यवस्थित बसणारे पट्टे आणि पाठीला मिळणारा आधार यांचा विचार करावा. शक्यतो दोन्ही खांद्यांवर समान भार पडेल अशा पद्धतीने दप्तर वाहण्याची सवय लावावी.

शिक्षण आनंददायी हवे, ओझे बनणारे नको!

शाळेची गुणवत्ता मोठ्या पुस्तकांवर, जास्त वह्यांवर किंवा अधिक गृहपाठावर ठरत नाही. विद्यार्थ्यांना किती पुस्तके दिली यापेक्षा त्यांनी किती समजून घेतले, किती आत्मविश्वासाने शिकले आणि प्रत्यक्ष जीवनात त्या ज्ञानाचा किती उपयोग केला, हे अधिक महत्त्वाचे आहे. आनंददायी वातावरणात कृतीतून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरते. दप्तराचे वजन हे केवळ पुस्तकांचे ओझे नाही, तर विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर, एकाग्रतेवर आणि आनंदी बालपणावर परिणाम करणारा प्रश्न आहे. सरकारी नियम तयार झाले, मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध झाल्या; पण त्यांचा प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. यासाठी शाळा व्यवस्थापन, शिक्षक आणि पालक यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या पाठीवर ज्ञानाची शिदोरी असावी, अनावश्यक वजनाचा भार नव्हे. शिक्षणाचा प्रवास आनंददायी, आरोग्यदायी आणि उत्साहवर्धक व्हावा, यासाठी दप्तराचे ओझे कमी करण्याच्या उपाययोजना केवळ कागदावर न राहता शाळांच्या दैनंदिन व्यवहारात उतरल्या पाहिजेत. अन्यथा, शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कायम राहील आणि त्यांच्या आनंदी बालपणावर त्याचा भार पडतच राहील.

पांढऱ्या सोन्याची नवी परीक्षा!

हवामानाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च अन् बाजारभावाची अनिश्चितता, कापूस उत्पादकांसमोर आव्हानांचा डोंगर



अमेय पाठक

शेतकऱ्याच्या घामातून फुलणारे कापसाचे पांढरे फूल दिसायला साधे असले, तरी त्यामागे मोठी अर्थव्यवस्था उभी आहे. कापूस हे केवळ नगदी पीक नाही, तर जिनिंग, सूतनिर्मिती, कापड आणि वस्त्रोद्योगाला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. कापसाच्या बियाण्यांपासून तेल, तर पेंडीतून पशुखाद्य मिळते. त्यामुळे कापसाचे महत्त्व शेताच्या बांधापुरते मर्यादित राहत नाही; ते रोजगार, उद्योग, व्यापार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेले आहे. या संपूर्ण साखळीचा पाया मात्र शेतकरी असतो. त्याच्या श्रमावर आणि जोखमीवर कापूस उद्योगाची उभारणी झालेली आहे.

जगभर कापसाचा वापर होत असला, तरी या पांढऱ्या सोन्यामागे असलेले शेतकऱ्याचे कष्ट आणि त्याने घेतलेली जोखीम अनेकदा दुर्लक्षित राहते. जागतिक कापूस दिन हा केवळ या पिकाचे आर्थिक महत्त्व अधोरेखित करण्याचा दिवस नाही, तर कापसाचा धागा तयार होण्यापूर्वी शेतकऱ्याला कोणत्या संकटांतून जावे लागते, याची जाणीव करून देणारी संधीही आहे. महाराष्ट्रासाठी या दिवसाचे महत्त्व अधिक आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील मोठ्या भागातील शेतकऱ्यांचे अर्थकारण कापसावर अवलंबून आहे. मात्र, हवामानापासून बाजारपेठेपर्यंत अनेक आव्हानांनी या शेतीला घेरले आहे.

हवामानाच्या लहरीपणाचा उत्पादनाला फटका

महाराष्ट्रातील कापूस लागवडीचे मोठे क्षेत्र कोरडवाहू असल्याने पावसाचे प्रमाण आणि त्याचे वितरण उत्पादनासाठी निर्णायक ठरते. पावसात खंड पडणे, अतिवृष्टी होणे किंवा पिकाच्या महत्त्वाच्या अवस्थेत जमिनीत पुरेसा ओलावा नसणे, याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. बदलत्या हवामानामुळे पारंपरिक पीक नियोजन अधिक कठीण झाले आहे. २०२६-२७च्या हंगामातही हवामानातील अनिश्चितता कापूस उत्पादकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. काही भागांत पावसाच्या खंडामुळे पिकाच्या वाढीवर परिणाम झाला, तर काही ठिकाणी फुलगळ आणि पात्या गळण्याच्या समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागले. या परिस्थितीत केवळ पाऊस पडण्याची वाट पाहणे पुरेसे राहिलेले नाही. पिकाच्या प्रत्येक टप्प्यावर हवामानाचा अंदाज, जमिनीतील ओलावा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन निर्णय घेणे आवश्यक झाले आहे. उपलब्ध पाण्याचे नियोजन, ठिबक सिंचन, सरी पद्धतीचा योग्य वापर आणि जमिनीतील ओलावा टिकविणाऱ्या उपाययोजना यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. कापसाला पाण्याची गरज असली, तरी अति पाणीही पिकासाठी नुकसानकारक ठरू शकते. त्यामुळे पिकाची अवस्था, जमिनीचा प्रकार आणि उपलब्ध पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन सिंचन करणे गरजेचे आहे.

खर्च वाढतोय, नफ्याचे गणित बिघडतेय!

कापूस उत्पादकांसमोरील दुसरे मोठे आव्हान म्हणजे वाढता उत्पादन खर्च. बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरी यांचे दर वाढत असल्याने शेतकऱ्याच्या आर्थिक गणितावर ताण येतो. विशेषतः कापूस वेचणीसाठी मोठ्या प्रमाणात मजुरांची गरज भासते. वेचणीचा खर्चही शेतकऱ्याच्या खिशाला मोठा भार ठरतो. एकीकडे उत्पादन खर्च निश्चित असतो, तर दुसरीकडे हवामान आणि बाजारभावामुळे उत्पन्नाची कोणतीही खात्री नसते. खर्च वाढत असताना उत्पादनाची अनिश्चितता आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे नफ्याचे गणित अधिकच कठीण होते. किडींचे व्यवस्थापन हाही कापूस शेतीतील महत्त्वाचा मुद्दा आहे. गुलाबी बोंडअळीसह विविध किडींचा प्रादुर्भाव झाल्यास उत्पादन आणि गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. कीड दिसताच वारंवार फवारणी करणे हा त्यावरील एकमेव उपाय नाही. अशा फवारण्यांमुळे खर्च वाढतो आणि पर्यावरणावरही परिणाम होऊ शकतो. नियमित पीक निरीक्षण, फेरोमोन सापळे, जैविक उपाय आणि गरजेनुसार शिफारशीत कीटकनाशकांचा वापर यांचा समन्वय आवश्यक आहे. सुधारित वाणांची निवड करतानाही स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धता यांचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

शेतातून बाजारपेठेपर्यंत गुणवत्तेची परीक्षा

कापूस वेचणीनंतर शेतकऱ्याची जबाबदारी संपत नाही. स्वच्छ वेचणी, योग्य साठवणूक आणि कापसात ओलावा जाऊ न देणे यामुळे त्याची गुणवत्ता टिकवता येते. कापसाला चांगला दर मिळण्यासाठी गुणवत्तेचे महत्त्व मोठे आहे. मात्र, गुणवत्तेचा योग्य मोबदला मिळतोच असे नाही. बाजारभावातील चढ-उतारांवर शेतकऱ्याच्या संपूर्ण हंगामाचे आर्थिक गणित अवलंबून असते. शेतातून बाहेर पडलेला कापूस जिनिंग, प्रेसिंग, सूतनिर्मिती, कापड आणि वस्त्रोद्योग अशा अनेक टप्प्यांतून पुढे जातो. या प्रवासात मोठी आर्थिक उलाढाल होते आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. मात्र, या साखळीतील सर्वाधिक प्राथमिक जोखीम शेतकरी उचलतो. पाऊस, किडी, उत्पादन खर्च आणि बाजारभाव अशा अनेक संकटांचा सामना करून तो कापूस बाजारात आणतो. त्यामुळे त्याला पारदर्शक खरेदी व्यवस्था, साठवणुकीच्या सुविधा आणि बाजारभावाची अचूक माहिती मिळणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाचा लाभ बांधापर्यंत पोहोचायला हवा


कापूस शेतीचे भवितव्य संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडलेले आहे. कमी पाण्यात चांगले उत्पादन देणारे वाण, हवामानाला अनुकूल लागवड पद्धती, मृदासंवर्धन आणि प्रभावी जलव्यवस्थापन यावर भर देणे आवश्यक आहे. अचूक शेती, ठिबक सिंचन आणि गरजेनुसार ड्रोनसारख्या तंत्रज्ञानाचा वापरही उपयुक्त ठरू शकतो. मात्र, तंत्रज्ञानाचा फायदा शेतकऱ्याच्या खर्चात बचत, उत्पादनवाढ किंवा निर्णयक्षमता सुधारण्यात दिसला, तरच त्याचा खरा उपयोग होईल. बाजारभावातील अस्थिरतेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांची सामूहिक ताकद वाढवणेही गरजेचे आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, सामूहिक साठवणूक सुविधा आणि थेट बाजारपेठेशी जोडणी यामुळे उत्पादकांची सौदेबाजीची क्षमता वाढू शकते. कापसावर प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाचे उद्योग ग्रामीण भागात उभे राहिले, तर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. कापूस उत्पादक प्रदेशांमध्येच प्रक्रिया उद्योगांचा विस्तार झाला, तर कच्चा माल पुरवणाऱ्या शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ मिळू शकतो.



अंमलबजावणी महत्त्वाची!



कापूस उत्पादकांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. मात्र, प्रश्न योजनांच्या संख्येचा नसून त्यांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत किती प्रभावीपणे पोहोचतो, हा आहे. अर्ज, कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे शेतकरी लाभापासून वंचित राहत असेल, तर योजनांचा मूळ उद्देशच अपूर्ण ठरतो. शासन, कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि शेतकरी यांच्यातील थेट संवाद वाढविणे आवश्यक आहे. स्थानिक परिस्थितीनुसार प्रशिक्षण, पीक सल्ला आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळाल्यास शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य निर्णय घेणे शक्य होईल. कापूस उत्पादकाला केवळ कच्चा माल तयार करणारा घटक समजणे योग्य नाही. वस्त्रोद्योगाच्या संपूर्ण साखळीचा तो महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. कापसाचा धागा गिरणीत पोहोचेपर्यंत अनेक प्रक्रिया पार पडतात; पण त्या प्रवासाची सुरुवात शेतकऱ्याच्या शेतातूनच होते. त्याच्या श्रमाला योग्य मोबदला, नैसर्गिक आणि आर्थिक जोखमीपासून संरक्षण तसेच बाजारपेठेत न्याय्य संधी मिळाली, तरच कापूस क्षेत्राचा विकास शेतकऱ्याच्या जीवनात खरा बदल घडवू शकेल. कापसापासून तयार होणाऱ्या वस्त्रांकडे पाहताना त्यामागील शेतकऱ्याच्या श्रमांचाही विचार व्हायला हवा. एका धाग्यात त्याचा घाम, निसर्गाची अनिश्चितता आणि बाजारपेठेचे कठीण गणित सामावलेले असते. म्हणून कापूस शेतीचा विकास म्हणजे केवळ उत्पादन वाढविणे नव्हे, तर त्या उत्पादनातून शेतकऱ्याच्या घरात आर्थिक स्थैर्य निर्माण करणे होय. शेतात फुलणाऱ्या कापसाला 'पांढरे सोने' म्हणणे सोपे आहे; पण त्या सोन्याची खरी किंमत शेतकऱ्याच्या घरात सुरक्षितता, स्थैर्य आणि समृद्धीच्या रूपाने पोहोचली पाहिजे. जागतिक कापूस दिन हा कापूस शेतीचा गौरव करण्यापुरता मर्यादित न राहता, कापूस उत्पादकांच्या श्रमांना न्याय देण्याची आणि त्यांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याची जाणीव दृढ करणारा दिवस ठरला पाहिजे. कारण पांढऱ्या सोन्याचे खरे मूल्य बाजारपेठेतील भावातच नव्हे, तर ते पिकवणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनमानातही मोजले गेले पाहिजे.



कुंडलवाडी व परिसरातील सर्व नागरीकांना

दिपावलीच्या

हार्दिक शुभेच्छा ...!



HAPPY Diwali



शुभेच्छूक

शिवसागर ट्रेडर्स,

मेन रोड, कुंडलवाडी ता. बिलोली



कुंडलवाडी व परिसरातील सर्व नागरीकांना

दिपावलीच्या

हार्दिक शुभेच्छा ...!







शुभेच्छूक

ज्ञानेश्वर मल्लू प्याटेकर

मयुर मेडीकल स्टोअर्स,

कुंडलवाडी ता. बिलोली



कुंडलवाडी व परिसरातील सर्व नागरीकांना

दिपावलीच्या

हार्दिक शुभेच्छा ...!



HAPPY Diwali

शुभेच्छूक

बालाजी पाटील शिंदे


जिल्हाध्यक्ष:राष्ट्रवादी युवक काँग्रेस,नांदेड

मा.सदस्य:जिल्हा नियोजन समिती,नांदेड,

उपसरपंच ग्रा.का.नागनी






आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात
सुखाची मग होते बरसात तेजाची मिळते साथ!
शुभ दिपावली
निमित्त सर्वांना
मंगलमय शुभेच्छा..!
सौ. विजयमाला बालाजीराव टेकाळे
प्रथम महिला लोकनियुक्त नगराध्यक्षा
देगलूर नगर परिषद,देगलूर



दिपावली
निमित्त
हार्दिक शुभेच्छा...
मोगलाजी ईरन्ना शिरशेटवार
शहराध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस देगलूर
मा.नगराध्यक्ष, नगर परिषद, देगलूर


दिपावली
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
व्यंकटराव पाटील गोजेगावकर
प्रदेश उपाध्यक्ष
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी महाराष्ट्र


इंडियनऑयल
IndianOil
मे. बिरादार गॅस सर्व्हिस
विशाल नगर, उदगीर रोड, देगलूर ता. देगलूर जिल्हा नांदेड
फोन ०२४६३-२५५६४०, २९५५५५
दिपावली
निमित्त हार्दिक
शुभेच्छा
: मुख्य वितरक :
इण्डेन गॅस एजन्सी
देगलूर


आमच्या सर्व ग्राहकांना,
हितचिंतक, मित्रांना
दिपावली
च्या हार्दिक
शुभेच्छा
: शुभेच्छुक :
मधुकर गोविंद नारलावार
कमिशन एजंट मोंढा, देगलूर जि.नांदेड
संतोष मधुकरराव नारलावार
नगरसेवक
नगर परिषद,देगलूर जि.नांदेड


दिपावली
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छुक :
मे. अनंत दाल इंडस्ट्रीज
वरदानंद दाल इंडस्ट्रीज
नांदेड रोड, देगलूर जि.नांदेड


सर्व शेतकरी बांधवांना व
हितचिंतक मित्रांना
दिपावली
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
नामांकित कंपनीच्या
बी-बियाणे व खताचे अधिकृत
व विश्वसनीय ठिकाण
गणेश
कृषि सेवा केंद्र
मोंढा, देगलूर जि.नांदेड


लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून निघो ही निशा
घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !
शुभ दिपावली
शुभेच्छुक : डॉ. सौ. पूजा सचिन गायकवाड


दिपावली
निमित्त हार्दिक
शुभेच्छा...
: शुभेच्छुक :
नंदुसेठ शाखावार
नगरसेवक
नगर परिषद,देगलूर जि.नांदेड


दिपावली
निमित्त हार्दिक
शुभेच्छा...
मारोतीराव व्यं. मोटरगेकर पाटील
देगलूर


दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...
चुकक
श्री साई क्लिनीक
पेठअमरापूर गल्ली, लाईनगल्ली
देगलूर, जि.नांदेड मो. ९४२३४३९६३९
डॉ.एस.बी.पब्बावार
ए.व्ही.बी. रजि.नं.१-३३१८४
रिया मेडिकल ॲण्ड.जनरल स्टोअर्स
०८२७५३९०५२१


सर्व ग्राहकांना,
मित्र न आमच्या सर्व
हितचिंतकांना
दिपावली
हार्दिक
शुभेच्छा
संगया गुंडया रेखावार
हाणमान्लु माणिक रेखावार
सराफा दुकान
जुना सराफा बाजार, देगलूर


दीपावली निमित्त
हार्दिक
शुभेच्छा
शुभेच्छुक मोविंद
ट्रेडिंग कंपनी
कमिशन एजन्ट, मोंढा, देगलूर
सूर्यकांत नारलावार, सुनील (बंटीसेठ) नारलावार
प्रेम सुनील नारलावार

दीपावलीच्या
लक्ष लक्ष
शुभेच्छा
शुभेच्छुक
शैलेंद्र चौव्हान
देगलूर जि. नांदेड .


शुभदीपावली
दिवाळी
निमित्त उभयना
मंगलमय शुभेच्छा...।
सुभाष कलेटवार
शासकीय कंत्राटदार
देगलूर जि.नांदेड मो.9423437446


संगया गुंडया रेखावार
हाणमान्लु माणिक रेखावार
सराफा दुकान
जुना सराफा बाजार, देगलूर

शुभ दिपावली
शुभेच्छुक
४३ वर्षापासून शेतकऱ्यांच्या
विश्वासपात्र ठरलेले एकमेव
मामडे फर्टीलायझर्स
मोंढा देगलूर, जि.नांदेड
नामांकीत कंपनीचे
बी-बियाणे, खते, किटकनाशकाचे
अधिकृत विक्रेते.

दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
देगलूर शहरातील एकमेव...
अंबिका ऑईल मील
गेल्या अनेक वर्षापासून शुद्ध तेल विक्रीसाठी प्रसिद्ध असलेले...
सराफा बाजार, देगलूर
मुन्नासेठ दुर्गेकर

दिपावली
निमित
हार्दिक शुभेच्छा
Vivek Kapratwar
Shri Krishna Pulses
Mill : Plot No. C-3, MIDC,
KHANAPUR, Tq. Degloor -431717
Dist. Nanded (M.S.)

दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
ॲड. संदीप राजाराम वरखिंडे
ॲडव्होकेट तथा नोटरी
कार्यालय : गांधी चौक, देगलूर
मोबा. ९४२२१८५२९१

दिपावली
हार्दिक
शुभेच्छा
: शुभेच्छुक :
गंगाराम विठोबा
मेडीवार
सराफा दुकान देगलूर, जि.नांदेड
सोन्या-चांदीच्या
तयार दागिन्यांचे
एकमेव विश्वसनीय
ठिकाण.
विठ्ठलराव मेडीवार
श्रीकांत मेडीवार

दिव्यांची दिवाळी फराळासोबत करु साजरी,
फटाक्यांना देऊन विराम, आनंद वाटू घरोघरी...

दिपावली

निमित्त आपणास व
आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा





• शुभेच्छुक •

शेख रफिक शेख महेबूब

लोकनियुक्त **नगराध्यक्ष,** न.पं.हिमायतनगर
सर्व नगरसेवक नगरपंचायत, हिमायतनगर

आर्या ग्राफिक्स 9284712371

दिव्यांची दिवाळी फराळासोबत करु साजरी,
फटाक्यांना देऊन विराम, आनंद वाटू घरोघरी...

तेजोमय दिप तेवावा आज
तुमच्या अंगणी,
तेजोमय प्रकाश पडावा सदैव
तुमच्या जीवनी,
बलिप्रतिपदा पाडव्याच्या
तुम्हाला आणि तुमच्या
परिवाराला खूप खूप शुभेच्छा!



शुभ दीपावली

निमित्त सर्व जनतेस
मंगलमय **शुभेच्छा..!**

शुभ दिपावली

आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा!





• शुभेच्छुक •

संजय बोड्डेवार

मराठा रेस्टॉरंट, नांदेड-किनवट रोड, हिमायतनगर

• शुभेच्छुक •

कुणाल राम राठोड


मा.नगराध्यक्ष, नगरपंचायत हिमायतनगर

आर्या ग्राफिक्स 9284712371

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

ग्राम पंचायत कार्यालय, बाऱ्हाळी

ता.मुखेड जि.नांदेड



नि.म.वडगावकर गुरुजी
सचिव,संधी निकेतन शिक्षण संस्था

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

जिव्हाळा निवासी दिव्यांग विद्यालय बाऱ्हाळी

ता.मुखेड जि.नांदेड



समता युवक मंडळ वडगाव संचलित
जिव्हाळा निवासी दिव्यांग विदयालय,बाऱ्हाळी
अध्यक्ष-श्री रमेशजी वडगावकर साहेब



श्रीमती नरवाडे के.एस.
मुख्याध्यापीका

शुभेच्छुक -
पठाण एन.आय.रेनगुंठवार व्हि.के.,पांचाळ बि.डी.,सुडके डि.जी.कदम एस.एन.जिवने बि.बि.,
भिका ए.एल.,मठदेवरु आर.जी.,शिंदे एम.एन.,मळेकरी सि.बि.बिरादार एस.पी.

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शिवाजी सर्व्हिस स्टेशन शुगर युनीट
श्री दत्तनगर बाऱ्हाळी

ता.मुखेड जि.नांदेड

शुभ दिपावली



शुभेच्छुक - श्री राजीव एस.घुले पाटील
(चेअरमन)











